गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज*
दि जैन मर्चन्ट्स को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाकाजी डेडगांवकर
Since 1935
सराफ ॲण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३१-५७/३७ | पाने ८ | किमत ३ रुपये | अहिल्यानगर, शनिवार दि. १२.०७.२०२५ | अंक नं. ८९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर + 15%* पर्यंत सूट
Conditions Apply*
या योजनेतील गिफ्ट बॉक्सेसचे भाग्यवान विजेते..



CKJ आजचा भाव — 12 जुलै — 22 कॅरेट सोन्याचा भाव (प्रती ग्रॅम) ₹8959/-*
CKJ उद्याचा भाव — 13 जुलै — 22 कॅरेट सोन्याचा भाव (प्रती ग्रॅम) ₹8959/-*

By Neha Bora Gandhi
60+ stalls
RAKHI SHOPPING Exhibition
12 & 13 July 2025
11am to 8pm
Sponsored By: MAHAVIR GROUP
Venue Kesargulab
Mangal Karyalay, Ahilyanagar
Free Entry For All !!!
For More Details: 9405139246
Designer Dresses | Saree | Jewellery | Home Decore | Many More

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
30% 70% डिस्काउंट सेल
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090
स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंटसवर गिफ्ट

बाळांच्या वजन, उंची, भूक व प्रतिकारशक्ती वाढण्यासाठी आजच भेट द्या.
सन-२०१० पासून
चिरायु
लहान मुलांचे क्लिनिक
(जन्मापासून ते १८ वर्षापर्यंत)
शाखा १ - सबजेल चौक, तुळजाभवानी मंदिरासमोर (डायमंड बेकरी समोर) अहिल्यानगर
9527931384 / 8830400170

एलिमेंटरी व इंटरमिजीएट ड्रॉईंग ग्रेड परिक्षा
Since 22 Years क्लासेस सुरु होत आहेत
विटणकर ड्रॉईंग & हॅण्डरायटींग क्लासेस
शनिवार व रविवारच्या खास बॅचेस
आर्किटेक्ट (NATA) व डिझाईनिंग एन्ट्रन्स क्लासेस
* पेन्सिल शेडींग * पोर्ट्रेट * कॅनव्हास पेंटींग
संपर्क- विटणकर हेमंत वसंत
तोफखाना, अहिल्यानगर
मो. 8830136142 / 9420800706

ऑल इंडिया फेडरेशन ऑफ ॲस्ट्रॉलॉजर्स सो. नवी दिल्ली (रजी.)
(पुणे चॅप्टर अंतर्गत रजि.)
* अहिल्यानगर मध्ये कोर्सेस - वास्तु शास्त्र, अंकशास्त्र, फेंगशुई इ.
www.aifas.com-pune chapter
www.vastumaharshi.blogspot.com
संपर्क - प्रशांत मांडे
वास्तु महर्षी (1st & 1st time in India) (Gold Medalist) फ्लाईंग स्टार फेंगशुई (Time & Space) Geomancy University, Singapore
५० वर्षे सिव्हिल इंजीनीयरिंग, २५ वर्षे वास्तु व फ्लाईंग स्टार फेंगशुई (Time & Space) Coach & Consultant
9823746626

शाडू मातीचे गणपती
पेण येथील शुद्ध शाडू मातीचे सजावट केलेले, शास्त्रोक्त सात्विक, मनमोहक, देखण्या श्रीमंत गणेशमूर्ती किफायतशीर दरात मिळण्याचे कलादालन
डेकोरेट केलेल्या मूर्ती पाहण्यासाठी अवश्य भेट द्या.
विधे आर्ट गॅलरी
१४ जुलै पासून बुकिंग सुरु
श्री लक्ष्मीनारायण मंदिरा समोर, बागडपट्टी, अ.नगर
मो. 9860222259, 9665022280

आपला माणुस, आपला चहा...
रत्नकमल चहा
ब्रँडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा एक वेळेस जरूर तुलना करून पहा
आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
Yashwantrao Chavhan Maharashtra Open University
Nashik, Maharashtra, India
तुमच्या करिअरला द्या, नवी दिशा...
- अभ्यासकेंद्र -
श्री स्वामी समर्थ बहुउद्देशीय संस्थेचे
श्री स्वामी समर्थ अभ्यासकेंद्र
कोंबडीवाला मळा, सोलापूर रोड, अहिल्यानगर.
अभ्यासकेंद्र संकेतांक - 51227
खालील अभ्यासक्रमास प्रवेश देणे सुरु आहे...
Courses - 1. Certificate in German Language.
2. Certificate in Beauty Parlour Management.
3. Diploma in Computer Hardware.
आपला प्रवेश लवकरात लवकर निश्चित करा...
संपर्क : प्रा.डॉ. माया उंडे 94237 92668
* कार्यालयीन वेळ * सकाळी 10:00 ते सायंकाळी 05:00 पर्यंत

## ॥ प्रथम पुण्यस्मरण ॥



**स्व. मुरलीधर दादू उमाप**
स्व. दि. १३/०७/२०२४

ज्योत अनंतात विलिन झाली,
स्मृती आठवणींनी दाटून आली
भाव सुमनांची ओंजळ भरुनी
वाहतो आम्ही श्रध्दांजली...
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली

* दुःखांकित *
श्री. शाम दादू उमाप
श्रीमती वत्सला मुरलीधर उमाप
संतोष मुरलीधर उमाप, वैशाली मुरलीधर उमाप
चांदणी किशोर पठारे (पुतणी), किशोर बन्सी पठारे
सोनाली रोहित जगधने, रोहित कैलास जगधने
हिम्मत शाम उमाप (पुतण्या), सिध्दांत किशोर पठारे (नातू)
चैताली किशोर पठारे (नात)

मर्चन्ट बँक..
शेड्युल्ड बँक झाली
गुरुला
गुरु पौर्णिमेच्या शुभ दिनी
गुरुदक्षिणा मिळाली...






५३ वर्षांपूर्वी आदरणीय
श्री. हस्तीमलजी मुनोत यांनी
अहमदनगर मर्चन्ट को-ऑप. बँकेची स्थापना केली
बँकेने अनेक विक्रम प्रस्थापित केले आणि आज माननीय श्री. हस्तीमलजी मुनोत चेअरमन असतांनाच
आपल्या बँकेला शेड्युल बँकेचा दर्जा प्राप्त झाला.
या बँकेचे आम्ही सभासद व खातेदार आहोत याचा आम्हाला आनंद व अभिमान आहे..
बँकेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सदैव प्रामणिकपणे प्रयत्नशील असलेल्या आदरणीय चेअरमन साहेबांचे व त्यांच्या बरोबर कटिबध्द असणाऱ्या सहकारी संचालक मंडळाचे, सभासदांचे व कर्मचाऱ्यांचे मन:पूर्वक
हार्दिक अभिनंदन !
महेंद्र (भैय्या) गंधे — मल्हार महेंद्र गंधे
सदैव शुभचिंतक
एम.एम.गंधे ॲण्ड कंपनी
सिक्युरिटी ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर
प्रोफेसर कॉलनी, सावेडी, अहमदनगर.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# खासदार निलेश लंकेंच्या आंदोलनास दुसऱ्या दिवशी जिल्हाभरातून पाठिंबा

**अधिकाऱ्यांकडून मनधरणी पण खा. लंके यांच्या ठाम भूमिकेमुळे प्रशासनाची धावपळ**

नगर - नगर-मनमाड महामार्गाच्या ७५ किलोमीटर अंतराच्या रस्त्याचे तात्काळ काम सुरू करावे या मागणीसाठी शुक्रवारपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसलेल्या खासदार निलेश लंके यांच्या आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी जिल्हाभरातून पाठिंबा मिळत आहे. प्रत्यक्ष काम सुरू झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही अशी भूमिका खा. लंके यांनी घेतल्याने प्रशासनाची चांगलीच धावपळ सुरु असून या रस्त्याचे काम सुरू करण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

नगर-मनमाड रस्त्याच्या कामासाठी खा. निलेश लंके हे गेल्या काही वर्षांपासून पाठपुरावा करत आहेत. खा. लंके यांनी यासंदर्भात केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केल्यानंतर या कामाची पुन्हा निविदा प्रसिध्द होऊन एप्रिल महिन्यात प्रत्यक्ष कार्यारंभ आदेशही देण्यात आला. मात्र दोन महिने उलटूनही हे काम सुरू न झाल्याने खा. लंके यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. लंके यांनी निवेदन देऊनही कार्यवाही न झाल्याने ११ जुलै पासून खा. लंके यांनी बेमुदत उपोषण सुरू केले.



आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी जिल्हा रूग्णालयातील डॉक्टरांच्या पथकाने खा. निलेश लंके यांची वैद्यकीय तपासणी केली.

१२ जुलै रोजी आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी राहुरी, राहता, कोपरगांव येथील विविध गावांचे सरपंच तसेच इतर पदाधिकारी, शिर्डी येथील पदाधिकारी तसेच व्यापारी यांनी आंदोलनस्थळी भेट देत खा. लंके यांच्या आंदोलनास पाठिंबा दर्शविला. रस्त्याच्या दुरावस्थेमुळे बाधित झालेल्या गावांव्यतीरिक्त जिल्ह्याच्या इतर भागांमधील नागरिक, पदाधिकारीही आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलनास पाठिंबा देत आहेत.

दरम्यान, ११ जुलै रोजी रात्री उशिरापर्यंत नगर शहरातील व्यापारी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, नगर शहरात वास्तव्यास असलेले शासकीय कर्मचारी यांच्यासह अनेक नागरिकांनी आंदोलनस्थळी भेट देऊन पाठींबा व्यक्त करत होते. त्यानंतर पहाटे उशिरा खा. लंके यांनी आंदोलनासाठी उभारण्यात आलेल्या मंडपामध्ये विश्रांती घेतली. आंदोलस्थळी दिवसा तसेच रात्रीही पोलीसांचा चोख बंदोबस्त होता.

### अधिकारी, ठेकेदाराकडून मनधरणी

दरम्यान, ११ जुलै रोजी सायंकाळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक वसंत पंदरकर, कार्यकारी अभियंता प्रशांत बेरड तसेच या रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराने खा. लंके यांची भेट घेऊन काम सुरू करतो आंदोलन मागे घेण्यासाठी मनधरणी केली, मात्र खा. लंके यांनी आपल्या भूमिकेवर ठाम राहत ७५ किलोमीटर अंतराचे काम असताना, कार्यारंभ आदेश मिळून दोन महिने उलटली तरी काम करण्यासाठी तुमची काय तयारी झाली आहे ? किती यांत्रीक उपकरणे आहेत ? याची ठेकेदाराकडे विचारणा केली, त्यावर ठेकेदार निरूत्तर झाला.

### खा. भाऊसाहेब वाकचौरे यांचा पाठिंबा

दरम्यान, खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी खा. निलेश लंके यांच्याशी संपर्क करून या प्रश्नावर मी तुमच्यासोबत आहे, दिल्लीतील महत्वपुर्ण बैठकीमुळे आपण दिल्लीमध्ये असल्याचे त्यांनी सांगितल्याचे खा. लंके यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. दरम्यान, खा. वाकचौरे यांनी प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करून या रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्याचे निर्देश दिल्याचेही लंके यांनी सांगितले.

## प्रेरणादायी अक्षरधन...

### निमित्त चातुर्मासाचे...संत साहित्य वाचनाचे...



सध्याच्या जीवघेण्या धावपळीत माणूस क्षणिक समाधानाच्या सुखाचा अविरत शोध घेत असतो. बऱ्याच वेळा तो मनाची कवाडे बंद ठेवून बाह्य सुखाच्या बुडबुड्यांना कवटाळीत असतो. त्यातून त्याच्या सुख कल्पनाही एकारलेल्या होतात. त्यांच्या डांखाची वेदनाही तो सौख्यरुप मानतो. या पार्श्वभूमीवर माऊलींनी सांगितलेली आनंदभूमीची संकल्पना कोण अंगीकारणार?

भोवतालचे समाजकारण, राजकारण, साहित्य या साऱ्यामध्ये फक्त अस्तित्ववादाचा प्रभाव पसरलेला आहे. 'मी'चा अहंकार आणि बुद्धी प्रामाण्यवादाचा अतिरेक आता प्रत्येकालाच जाणवू लागला आहे. व्यक्ती व तिच्याभोवती वावरणारा विशिष्ट गट यांनाच फक्त लोकमान्यता अन् अनुषंगाने मिळत असलेली राजमान्यता आज ठायी ठायी जाणवत आहे.

आजच्या गोंधळलेल्या मराठी माणसाच्या मनाला एखाद्या अनावर क्षणी चिदानंदाची, आत्मीय आनंदाची नितांत गरज आहे. नुकतीच आषाढी एकादशी होऊन गेली. चातुर्मासामुळे मन पावन पवित्र कर्मकांडात आनंदतो. त्यात चहु बाजूने निसर्ग आपलं सारं सौंदर्य, औदार्य उधळीत आहे.

याच मंगलमय वातावरणात व भक्तीच्या पावसात योग्य संत साहित्य वाचल्यास आनंदानुभूती अधित वाढेल असे वाटते. हजारो दिंड्यांतून पंढरपूरी जाऊन आलेल्या लाखो वारकऱ्यांनी आता ज्ञानाची दिंडी चालवावी. त्यासाठी सप्ताह, पारायणे, प्रवचने इ. शिवाय किमान एखाद्या संतांवरील ग्रंथ, पुस्तक मनापासून वाचावे. रविंद्र भट यांचे काही पुस्तके सर्वोच्च भावभक्तीची ओळख व अनुभूती करुन देतात. त्यांचे संत ज्ञानेश्वर माऊलींवरील 'इंद्रायणी काठी' हे पुस्तक वाचावेच असे आहे. त्यातील अलंकृत वाक्यरचना खिळवून ठेवले. याशिवाय त्यांच्या भगीरथ, अनादि मी अनंत मी, देवाची पाऊले, सागरा प्राण तळमळला, घास घेई पांडुरंगा, भेदिले सुर्यमंडळा इ. कादंबऱ्या वाचनीय आहेत.

### घरासमोर लावलेल्या मोटारसायकलची चोरी

नगर - घरासमोर रस्त्याच्या कडेला हॅंडेल लॉक करुन लावलेली होंडा कंपनीची मोटारसायकल (क्र. एम एच १६ बी एक्स ८७६०) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. ही घटना नगर तालुक्यातील दरेवाडी येथे ७ जुलै रोजी रात्री दीड ते पहाटे चार वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात संदीप मोहनीराज आवटी (वय ५१, रा. दरेवाडी ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चोरट्याविरुद्ध बी एन एस ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

### कांद्याची चोरी

नगर - शेतातील घराजवळ असलेल्या कांद्याच्या चाळीतून अज्ञात चोरट्याने ४८ हजार ४०० रुपये किमतीचा कांदा चोरुन नेला. ही घटना नगर तालुक्यातील शिंगवे नाईक येथील हनुमान वाडी येथे १० जुलै रोजी सायंकाळी ६ ते ११ जुलै रोजी सकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत संतोष नामदेव पवार (वय ३८, रा. हनुमान वाडी, शिंगवे नाईक, ता. नगर ) यांनी दिलेल्या म्हटले आहे की फिर्यादी यांच्या शेतातील घराजवळ असलेल्या कांदा चाळीत ठेवलेला ४८ हजार ४०० रुपये किमतीचा कांदा अज्ञात चोरट्याने चोरुन नेला. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात संतोष पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बी एन एस ३०३(२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास सहाय्यक फौजदार खेडकर हे करीत आहेत.

# 'इन्फीनाईट बिकन फायनान्स'कडून गुंतवणूकदारांची २८ लाखांची फसवणूक

### श्रीगोंद्यापाठोपाठ नगर शहरातही गुन्हा दाखल, संचालक मंडळ पसार

नगर - 'इन्फीनाईट बिकन फायनान्सियल सर्व्हिसेस प्रा. लि.' आणि 'मास्टर सिनर्जी एड्युटेक एलएलपी' या कथित फायनान्स कंपन्यांनी २८ लाख रूपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अधिक परताव्याचं आमिष दाखवून ही फसवणूक करण्यात आल्याचा आरोप असून या प्रकरणी सहा गुंतवणूकदारांनी तोफखाना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या कंपनीवर काही दिवसांपूर्वी श्रीगोंदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला आहे, तसेच पारनेर तालुक्यातही अनेकांचे पैसे अडकलेले आहेत.

याप्रकरणी गिरीश खासेराव जगताप (वय २७, रा. भिस्तबाग चौक, सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ११ जुलै रोजी दुपारी सीईओ अगस्त मिश्रा, संचालक राहुल काळोखे, गौरव सुखदेवे, प्रसाद कुलकर्णी, सचिन खडतरे, चेतन धर, ययाती मिश्रा आणि मार्केटिंग डायरेक्टर नवनाथ अवताडे (पत्ता माहिती नाही) यांच्याविरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

अहिल्यानगर शहरातील एका हॉटेलमध्ये २०२४ मध्ये झालेल्या गुंतवणूक सेमिनारमध्ये अनेकांना १० ते १२ टक्के परताव्याचं आमिष दाखवण्यात आलं. त्यानुसार गिरीश जगताप यांनी १५ मार्च २०२५ रोजी ३ लाख रूपये गुंतवले. परंतु, अपेक्षित परतावा मिळाला नाही. वेळोवेळी संपर्क करूनही समाधानकारक उत्तर न मिळाल्याने फसवणुकीचा उलगडा झाला. जगताप यांच्यासह ऋषिकेश खामकर (५ लाख), तुषार यादव (५ लाख), दिनेश नन्नवरे (५ लाख), मंगेश लोहकरे (५ लाख), विजय गुळवणे (५ लाख) - अशा सहा गुंतवणूकदारांनी एकूण २८ लाखांची गुंतवणूक केली आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर करत आहेत.

### पोलीस दलातील कर्मचारीही फसले गेले

एजंट म्हणून कार्यरत असलेल्या जिल्हा पोलीस दलातील अनेक कर्मचार्यांनीच खात्यातील इतरांना गुंतवणुकीसाठी प्रवृत्त केलं असल्याचे समोर आले आहे. पोलीस दलात त्याची जोरदार चर्चा रंगली आहे. पोलीस दलातील अनेकांनी विश्वासाने मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली, मात्र कंपनीचे संचालक पसार झाल्याने पैसे कोणाकडे मागायचे असा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण झाला आहे. या कंपनीसाठी काम करणार्या पोलीस दलातील एजंटांनी स्वत:ची पोतडी भरली, पण गुंतवणूकदार पोलिसांनी त्यांच्याकडे पैशाची मागणी केल्यावर त्यांना फक्त आश्वासनं दिली जात आहे.

# हक्काचे आरक्षण वाचविण्यासाठी ओबीसी समाजाने जागरूक राहून संघटीत व्हावे

### माजी खासदार समीर भुजबळ यांचे आवाहन, नगरमध्ये घेतली समता परिषदेची आढावा बैठक

नगर - ओबीसींच्या हक्काच्या आरक्षणावर गदा आणण्याचे काम काही जण करत आहेत. यापूर्वीही असे झालेले आहे. त्यावेळी आपण सर्वांनी संघटीत होवून एकजुटीने लढा दिल्याने आपले आरक्षण वाचले आहे. आता पुन्हा काही जण मुंबई वर मोर्चे काढण्याचे इशारे देत आहेत. त्यामुळे आपले हक्काचे आरक्षण वाचविण्यासाठी ओबीसी समाजातील सर्व जातीच्या लोकांनी अधिक जागरूक राहून संघटीत व्हावे असे आवाहन माजी खासदार समीर भुजबळ यांनी केले आहे.

नगर जिल्ह्यातील अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत संयुक्त 'संवाद आढावा बैठक'माजी खासदार समीर भुजबळ यांनी १२ जुलै रोजी नगर शहरात घेतली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अॅड. अभय आगरकर, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी आमदार पांडुरंग अभंग, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष आण्णासाहेब शेलार, अंबादास गारुडकर, बाळासाहेब बोराटे, संजय गारुडकर, दत्ता जाधव यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



नगरमधील अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत बोलताना समीर भुजबळ. (छाया - लहू दळवी)

या बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यपद्धती, संघटनात्मक सद्यस्थिती आणि आगामी दिशा यावर विचारमंथन झाले. ओबीसी आरक्षण, हक्कांचे संरक्षण आणि प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे, असे यावेळी समीर भुजबळ यांनी आवर्जून अधोरेखित केले.

ओबीसी समाजात ३५० जाती आहेत. या सर्वांना एकत्र करण्यासाठी मंत्री छगन भुजबळ यांनी देशभरात मेळावे घेतले. सर्वांना संघटीत केले, त्यामुळे मंडल आयोग लागू झाला आणि त्याचा सर्वांना फायदा झाला आहे. आता पुन्हा समता परिषदेच्या माध्यमातून राज्यभर ओबीसी समाजाचे संघटन वाढविण्यासाठी दौरा सुरु आहे. विदर्भ, मराठवाड्याचा दौरा पूर्ण झाला आहे. आता उर्वरित महाराष्ट्राचा दौरा सुरु आहे. समता परिषद ही एका जातीसाठी नव्हे तर ओबीसी समाजाच्या सर्व जातींसाठी काम करणारी संघटना आहे. ती आणखी मजबूत करण्यासाठी प्रत्येकाने योगदान देणे गरजेचे आहे. असे आवाहन ही भुजबळ यांनी केले.

### महानगर अध्यक्ष पदासाठी इच्छुकांच्या मुलाखती

या नगर दौऱ्यात समीर भुजबळ यांनी नगर शहर आणि ग्रामीण मधील पदाधिकाऱ्यांशी स्वतंत्रपणे संवाद साधला. यावेळी नगर शहर महानगर अध्यक्ष पदासाठी इच्छुक असलेल्यांच्या त्यांनी मुलाखती घेतल्या. याचा अहवाल मंत्री छगन भुजबळ यांना सादर करण्यात येणार असून त्यांच्या सूचनेनुसार महानगर अध्यक्षांची निवड करण्यात येईल असेही समीर भुजबळ यांनी यावेळी सांगितले.

# पतसंस्था, बॅंकांच्या कर्जदारांच्या समस्या निवारण्यासाठी सहकार लोक अदालत सुरु करावी : मुख्यमंत्र्यांकडे मागणी

नगर - सहकार जिल्हा उपनिबंधक यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्यात पतसंस्था व सहकारी बॅंका यांच्या कर्जदारांच्या समस्या, वाद, तंटे निर्मूलन करण्यासाठी जिल्हानिहाय सहकार लोकअदालत सप्ताहाचे आयोजन करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

राज्यात खूप मोठ्या प्रमाणावर सहकारी पतसंस्थांचे जाळे आहे व उपरोक्त पतसंस्थांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर लहान-मोठ्या स्वरुपाची आर्थिक कर्जे ग्रामीण भागातील गरजू शेतकरी वर्गास वितरीत केली जातात. परंतु कर्जदारास पैशाची घाई असते, तो कर्ज घेताना व त्याच्या व्याजाच्या टक्केवारीचा कुठलाही विचार न करता घाईघाईत कर्ज घेतो व नंतर व्याजाच्या व चक्रवाढ व्याजाच्या व पतसंस्थांच्या सावकारी, पठाणी वसुलीच्या व दंड व्याजाच्या चक्रात अडकून पडतो. याचा गैरफायदा पतसंस्था चालक घेतात व मुद्दल रक्कम कर्जापेक्षा चौपट व काही काही प्रकरणात १०० पट जास्त व्याज आकारतात असे पाहण्यात आले आहे. कर्जदार हा संस्थेचे कर्ज घेतलेले असते व त्याचे कर्जाबाबतचे संरक्षण अधिकारी काय आहेत, हे माहीत नसल्याने तो आत्महत्या करण्याकडे वळतो, ही अत्यंत गंभीर बाब आहे.

तरी पतसंस्थांच्या व सहकारी मल्टीस्टेट बॅंकांच्या गैरप्रकाराला आळा घालण्याच्या दृष्टीकोनातून राज्यात दर वर्षी जिल्हानिहाय सहकार लोकअदालत घेण्याचा उपक्रम राज्य पातळीवर घेण्यात यावा, अशी मागणी नितीन थोरात यांनी केली आहे.

# शनि शिंगणापूर मंदिर विश्वस्त मंडळ बरखास्त, गुन्हेही दाखल होणार

**मुख्यमंत्र्यांची विधानसभेत घोषणा, आ.विठ्ठल लंघे, सुरेश धस यांनी उठवला आवाज**

मुंबई - कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी शनि शिंगणापूर येथील शनेश्वर देवस्थानचे विश्वस्त मंडळ बरखास्त करण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ११ जुलै रोजी विधानसभेत केली. जे कर्मचारी अथवा विश्वस्त लोकसेवकच्या संज्ञेमध्ये येत असतील त्या सगळ्यांच्या अपसंपदेची चौकशी केली करून त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल केले जातील, असेही फडणवीस यांनी सांगितले.

नेवाशाचे आमदार विठ्ठल लंघे आणि आष्टीचे आमदार सुरेश धस यांनी विधानसभेत शनि मंदिरातील घोटाळ्यांबद्दलची लक्षवेधी सूचना मांडली होती. या सुचनेवरील चर्चेला उत्तर देताना फडणवीस यांनी शनि शिंगणापूर देवस्थानात तब्बल २ हजार ४७४ बोगस कर्मचारी दाखवून देवस्थानचे पैसे पगाराच्या स्वरूपात आपल्याच कार्यकर्त्यांच्या खात्यात वळते केल्याचे सांगत देवस्थानच्या गैरकारभाराचा सारा हिशोबच विधानसभेत उघड केला. देवाच्या नावावर भ्रष्टाचार करणाऱ्यांना त्यांची जागा दाखविली जाईल, असा निर्धारही त्यांनी बोलून दाखवला.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी विश्वस्त मंडळाच्या व्यवहारांची चौकशी केलेल्या सरकारी समितीच्या अहवालातील धक्कादायक माहिती सभागृहाला दिली. डमी अॅपवर भक्तांकडून देणग्या घेतल्या जायच्या आणि त्यातील कोट्यवधी रुपये हे विश्वस्तांच्या कार्यकर्त्यांच्या नावे उघडलेल्या बॅंक खात्यांमध्ये परस्पर जमा व्हायचे. त्यामुळे या प्रकाराची सायबर सेलच्या अतिरिक्त पोलीस महासंचालकांमार्फत चौकशी केली जाईल. या मंदिरात मी गेली अनेक वर्षे जातो. २५८ कर्मचारी होते तेव्हा मंदिराचा कारभार नीट चालायचा. विश्वस्त मंडळाने तब्बल २ हजार ४४७ कर्मचाऱ्यांची भरती केली, चौकशीमध्ये प्रत्यक्षात तेवढे कर्मचारी अस्तित्वातच नसल्याचे आढळले, अशी धक्कादायक माहिती फडणवीस यांनी दिली.

याप्रकरणी विधी आणि न्याय विभागाला फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, पोलिसांना बाहेरील पथक पाठवून चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. यापूर्वी आलेल्या तक्रारींनुसार विशेष ऑडिट करण्यात आले होते. त्यावेळी धर्मादाय विभागाच्या एका अधिकाऱ्याने क्लिनचिट दिली होती. या अधिकाऱ्याची खातेनिहाय चौकशी केली जाईल. आधीचा अनुभव लक्षात घेता पोलिसांच्या बाहेरील पथकाला चौकशी करण्यास सांगितले जाईल, असेही फडणवीस म्हणाले.

तत्पूर्वी विठ्ठल लंघे यांनी देवस्थान विश्वस्त मंडळाच्या भ्रष्टाचाराची कार्यपद्धती सांगितली. या ट्रस्टच्या विश्वस्तांनी डमी अॅप तयार करून लाखो भक्तांकडून त्यावर पूजेसाठीच्या देणग्या स्वीकारल्या. असे तीन चार अॅप होते आणि प्रत्येक अॅप वर तीन-चार लाख भक्तांनी पैसे पाठविले, असे लंघे म्हणाले. या शिवाय बोगस भरतीवरही त्यांनी प्रकाश टाकला. एकूण घोटाळा १०० कोटींचा असल्याचे ते म्हणाले. भाजपचे सुरेश धस यांनी हा घोटाळा ५०० कोटींचा असून ट्रस्टचे विश्वस्त दर आठवड्याला दहा-दहा कोटी रुपयांच्या जमिनी घेत आहेत, असा गंभीर आरोप केला.

# गट व गण रचना २०१७ प्रमाणेच ठेवा, त्यात तोडफोड नको

### खा. निलेश लंके यांचे जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर - आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यातील गट व गण रचना २०१७ साली अस्तित्वात असलेल्या जुन्याच स्वरुपात कायम ठेवावी, अशी मागणी खासदार निलेश लंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात असे स्पष्ट करण्यात आले आहे की, २०१७ साली ज्या गट व गण रचनेच्या आधारे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका पार पडल्या, त्या रचनेमध्ये त्यानंतर कोणताही नविन गट अथवा गण समाविष्ट करण्यात आलेला नाही. परिणामी, नव्याने कोणतीही फेररचना करण्याची आवश्यकता नाही.

या निवेदनात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला येऊन चिंता व्यक्त केली आहे की, गट व गण रचनेच्या प्रक्रियेमध्ये राजकीय हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे निवडणुकांच्या पारदर्शकतेवर व निष्पक्षतेवर परिणाम होण्याची भीती आहे. त्यामुळे गट व गण रचनेत कोणतेही बदल न करता ती २०१७ मधील जुन्याच स्वरुपात ठेवावी, ही मागणी करण्यात आली आहे.

खासदार लंके यांनी असा दावा केला आहे की, गट व गण रचनेत कोणताही बदल न केल्यास जिल्ह्यातील सामाजिक समता व राजकीय स्थैर्य टिकून राहील. कोणत्याही वर्ग अथवा गटावर अन्याय होणार नाही याची प्रशासनाने विशेष काळजी घ्यावी, अशी अपेक्षा या माध्यमातून व्यक्त करण्यात आली आहे. या निवेदनावर जिल्हा प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. सध्याच्या स्थितीत पारदर्शक आणि न्याय्य निवडणूक प्रक्रिया होण्यासाठी प्रशासनाने कोणते निर्णय घेतले जातात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# शिवीगाळ का केली म्हणत तरुणाला बेदम मारहाण

नगर - आम्हाला शिवीगाळ का केलीस अशी विचारणा करुन मोटारसायकल स्वारासह अन्य दोघांनी तरुणास शिवीगाळ दमदाटी करीत काहीतरी टणक वस्तूने व लाथाबुक्क्यानी बेदम मारहाण करुन ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना नगर तालुक्यातील नांदगाव येथील बसस्टॅन्ड जवळ १० जुलै रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात निखील दिलीप वाघ (वय २५, रा. रेणुकाईवाडी मिरी, ता. पाथर्डी, अ.नगर. हल्ली रा.पाईपलाईन रोड, सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादी हे नगर तालुक्यातील नांदगाव बस स्टॅन्डजवळ रात्री ८ वाजण्याच्या सुमारास थांबलेले असताना तेथे मोटारसायकल (क्र. एम एच १७ ए के १६७८) वरील अनोळखी मोटारसायकल स्वाराने त्यांना थांबवले आणि त्याच्या दोन मित्रांना बोलावून घेतले. आणि आम्हाला शिवीगाळ का केलीस असे म्हणून फिर्यादीच्या डोक्यात काहीतरी ठणक वस्तूने मारुन जखमी केले. तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ करीत ठार मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात निखिल वाघ यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तिघांविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### डोकेदुखीपासून मिळवा आराम

आजकालचे धावपळीचे जीवन, स्क्रीनवर वाढता वेळ, झोपेचा अभाव आणि वाढता ताण, या सर्व गोष्टी डोकेदुखीची समस्या सामान्य करत आहेत. बऱ्याचदा लोक तात्काळ आराम मिळवण्यासाठी वेदनाशामक औषधांचा अवलंब करतात, परंतु वारंवार औषध घेतल्याने शरीरावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. जर तुम्ही डोकेदुखीपासून आराम मिळवण्यासाठी नैसर्गिक, निरोगी आणि दुष्परिणाममुक्त मार्ग शोधत असाल तर आले हे एक नैसर्गिक दाहक-विरोधी औषध आहे. डोकेदुखी, मायग्रेन आणि मळमळ कमी करण्यासाठी ते प्रभावी आहे. पाण्यात आले उकळा आणि त्यात थोडे लिंबू आणि मध घालून प्या. ही चहा केवळ डोकेदुखी कमी करत नाही तर पचन सुधारते. तसेच पुदिन्यामध्ये मेन्थॉल असते जे नसा शांत करते आणि डोकेदुखीमध्ये त्वरित आराम देते. लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी असते जे डिहायड्रेशन आणि थकवा दूर करते. पुदिन्याची पाने, लिंबाचा रस आणि थोडे मध मिसळून थंड पाणी पिल्याने डोकेदुखी लवकर कमी होते. डिहायड्रेशन हे डोकेदुखीचे एक प्रमुख कारण आहे. नारळाचे पाणी इलेक्ट्रोलाइट्सने समृद्ध असते आणि शरीराला त्वरित हायड्रेट करते. उष्णता किंवा थकव्यामुळे होणाऱ्या डोकेदुखीवर ते खूप प्रभावी आहे. जर डोकेदुखी तणावामुळे किंवा झोपेच्या कमतरतेमुळे होत असेल तर कॅमोमाइल चहा हा सर्वोत्तम पर्याय आहे. ही हर्बल चहा स्नायूंना आराम देते आणि तणाव कमी करते. रात्री झोपण्यापूर्वी ते प्यायल्याने चांगली झोप येण्यास देखील मदत होते.

## पाककला

### ब्रोकोली भुर्जी

**साहित्य :** १ वाटी ब्रोकोली, १ बारिक चिरलेला कांदा, लाल तिखट आवडी नुसार, १/४ चमचा धणे जीरे पूड, हळद, चवीनुसार मीठ, १/४ चमचा जीरे मोहरी, १ चमचा तेल

**कृती :** गॅसवर कढईमध्ये तेल टाकून जिरे, मोहरी, हिरवी मिरची, बारिक चिरलेला कढीपत्ता याची फोडणी करुन कांदा परतून घ्या. लाल तिखट, हळद, धणे, जिरेपूड घालून सर्व मिक्स करुन हलवून घ्या. आता छान स्वच्छ साफ केलेला ब्रोकोली वरुन घालून एकदा हलवून घ्या व चवीनुसार मीठ घाला आणि झाकण ठेऊन द्या. मधेमधे झाकण खोलून हलवून घ्या. जेणेकरून ब्रोकोली कढईला खाली चिकटणार नाही. भाकरी व पोळीबरोबर छान लागते.

## सल्ला

❊ बिस्किटे आणि कुकीज नेहमी हवाबंद कंटेनरमध्ये ठेवा. यामुळे हवा आणि ओलावा आत जात नाही आणि बिस्किटे बराच काळ ताजे आणि कुरकुरीत राहतात.

❊ कंटेनरमध्ये तांदूळ किंवा मीठ ठेवा तुम्ही कंटेनरमध्ये एका लहान भांड्यात तांदूळ किंवा थोडे मीठ देखील ठेवू शकता. हे ओलावा शोषून घेतात आणि बिस्किटे लवकर मऊ किंवा खराब होण्यापासून रोखतात.

## वास्तू

घरासमोरुन जर टी आकाराचा रस्ता जात असेल तर येथे राहणारे सर्व सदस्य मानसिकदृष्ट्या अस्वस्थ राहतात.

## सौंदर्य

चेहऱ्यावर ४ ते ५ मिनिटे तुरटी लावा आणि नंतर चेहरा धुवा. तुम्ही आठवड्यातून २ ते ३ वेळा ते वापरू शकता. यामुळे तुमचा रंग उजळू लागतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. १३ जुलै २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, श्रवण ०६।५३ सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

## राशिभविष्य

**मेष :** एखाद्या कार्यक्रमाला उपस्थित रहाल. घाई करणे अडचणीत टाकू शकते. पैसे कमविण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल.

**वृषभ :** चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी चांगली वेळ आहे. आजचा दिवस विधायक कामासाठी चांगला आहे. आपला जोडीदार आपल्या बरोबर राहिल.

**मिथुन :** काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. मनोरंजनावर खर्च होईल.

**कर्क :** उत्तम भोजनाचे सुख मिळेल. मित्रांपासून आनंद मिळेल. प्रेमसंबंधात यश मिळेल. आपत्यांपासून आनंदप्राप्ती होईल. वाहनसुख मिळेल.

**सिंह :** योजनाबद्धरितीने आपले काम करण्याचा प्रयत्न कराल. कार्य एखाद्यावर विसंबून करणार नाहीत.

**कन्या :** नेहमीपेक्षा अधिक चांगले काही घडण्यासाठी आपणास आपल्या कामात एकाग्रता वाढवण्याची आवश्यकता आहे.

**तूळ :** जुने मित्र मंडळी भेटतील. वाहने व उपकरणे जपून वापरावीत. मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील.

**वृश्चिक :** मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात.

**धनु :** मनोरंजनासाठी वेळ काढाल. एखाद्या कल्पक, सर्जनशील कार्यात गुंतलेले राहू शकता. मित्रांकडून सहयोग मिळेल. व्यापार-व्यवसायात स्थितीत सुधार होईल.

**मकर :** आरोग्य उत्तम राहील. आपल्या हातात आलेल्या संधी निसटू देऊ नका. मागील उधारी उसनवारी वसुल होईल. अनुकूल स्थिती मिळेल. प्रसिद्धी मिळेल.


**कुंभ :** आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. प्रशासकीय कामे पूर्ण होतील. नवीन कार्याचे स्वरूप बनविण्यासाठी वेळ उत्तम.

**मीन :** व्यापार-व्यवसायात स्थिती नरम-गरम राहील. आरोग्य उत्तम राहील व एखाद्या जुन्या मित्राशी भेट होण्याची शक्यता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२१९

सौ.शैलजा कुलकर्णी



**शब्दगंध क्र. ७२१८ चे उत्तर**



**आडवे शब्द :-** १) मधल्या भागात; अंतर्भागात; मध्ये ३) एक मोगल बादशहा ६) निष्णात; प्रवीण; तज्ज्ञ ८) पत्थर; धोंडा ९) घोटाळा; तंट्यास कारण; प्रस्थ ११) भारतातील एक नदी १३) अटीची भाषा १६) कोणत्या प्रकारचा १८) समुदाय; जमाव; सोसायटी २०) मासळी; पायात घालावयाचा माशाच्या आकाराचा स्त्रियांचा एक अलंकार २२) यंत्र झिजू नये म्हणून त्याच्या सांध्यात घालतात ते तेल वगैरे २३) मुलगा; सुत; पुत्र २४) नवरा; मालक; धनी

**उभे शब्द :-** १) पायापासून डोक्यापर्यंत २) लाट; लहर; नवनव्या कल्पना; उर्मी ३) शेतकऱ्याचे शेतीचे अवजार ४) जाणे; प्रस्थान करणे ५) माळजमीन ७) पुरुन उरेल इतके (धन) ९) भविष्य १०) संरक्षणासाठी रात्री केला जाणारा फिरता पहारा १२) वाघाचे ओरडणे १४) जिव्हा; जीभ; रसना १५) पाणी भरण्याचे मातीचे एक प्रकारचे भांडे, मोठा डेरा १७) कोणत्याही वस्तू १९) तपास, शोध; पत्ता २१) सुविधा

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** चिंता केल्याने नाही तर चिंतन केल्याने मार्ग निश्चित सापडतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कोणती फळे पावसाळ्यात खाणे सर्वोत्तम आहेत?

पावसाळा ऋतू पाऊस आणि हिरवळ घेऊन येतो, परंतु या ऋतूमध्ये आजारांचा धोका देखील वाढतो. अशा परिस्थितीत, प्रत्येकाने आपल्या आहाराची विशेष काळजी घेतली पाहिजे कारण जेव्हा आहार योग्य असेल तेव्हाच आपले आरोग्य चांगले राहते आणि आपण निरोगी आणि ताजेतवाने वाटतो. जर आपण आजारी पडलो तर आपण या पावसाळ्याचा आनंद घेऊ शकणार नाही, म्हणून हे करण्यासाठी आपण चांगले खाणे आणि निरोगी राहणे महत्वाचे आहे. निरोगी राहण्यासाठी पावसाळ्यात काही फळांचा सेवन केल्याने आजार दूर राहतील.

डाळिंब हे हंगामी फळ नाही आणि ते सहसा सर्व ऋतूंमध्ये उपलब्ध असते. त्याची खासियत अशी आहे की तुम्ही ते कोणत्याही ऋतूमध्ये खाऊ शकता. डाळिंब हे शरीरात रक्त वाढवण्यासाठी एक महत्त्वाचे फळ मानले जाते आणि पावसाळ्यात त्याचे सेवन देखील विशेष फायदेशीर आहे. त्यात भरपूर लोह, व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. या गोष्टी आपल्या शरीरातील रक्ताची कमतरता पूर्ण करतात आणि हिमोग्लोबिनची पातळी वाढवतात. पावसाळ्यात बाजारात नाशपाती सहज उपलब्ध होतात. हे साधे फळ आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. त्यात फायबर, व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन के असते. ते पचन सुधारते आणि बद्धकोष्ठतासारख्या समस्यांपासून आराम देते. या ऋतूत, तज्ञ अनेकदा हलके आणि सहज पचणारे अन्न खाण्याचा सल्ला देतात आणि नाशपाती या श्रेणीत अगदी योग्य बसतात. ते तुमची रोगप्रतिकारक शक्ती देखील वाढवते.

दररोज एक सफरचंद खा आणि डॉक्टरांना दूर ठेवा, ही म्हण आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत आणि ती प्रत्यक्षात खरी आहे. फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजांनी समृद्ध सफरचंद पचन सुधारते आणि पोटाच्या समस्या दूर ठेवते. पावसाळ्यात पोटाच्या समस्या अनेकदा उद्भवतात, अशा परिस्थितीत, आपण नियमितपणे सफरचंद खाल्ल्याने या समस्या टाळू शकतो. सफरचंद खाल्ल्याने आपली रोगप्रतिकारक शक्ती देखील वाढते आणि आपण हंगामी आजारांपासून सुरक्षित राहतो.

जामुन हे पावसाळ्यात आढळणाऱ्या हंगामी फळांपैकी एक आहे. पावसाळ्यात ते मुबलक प्रमाणात आढळते आणि सर्वांनाच त्याची गोड आणि आंबट चव आवडते. पण ते केवळ चविष्टच नाही तर एक आरोग्यदायी फळ देखील आहे. त्यात व्हिटॅमिन सी, लोह आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. पावसाळ्यात आर्द्रतेमुळे बॅक्टेरियाचा धोका वाढतो, अशा परिस्थितीत जामुन पोटाच्या समस्या आणि संसर्गापासून तुमचे रक्षण करण्यास मदत करते. मधुमेहाच्या रुग्णांसाठी देखील जामुन खूप फायदेशीर मानले जाते.


## मुर्ख शेळ्या

एका जंगलात दोन शेळ्या राहत होत्या. आता दोघेही जंगलाच्या वेगवेगळ्या भागात गवत खात असत. त्या जंगलात एक नदीही वाहत होती, ज्याच्या मध्यभागी एक अतिशय अरुंद पूल होता. तसेच या पुलावरून एका वेळी फक्त एकच प्राणी जाऊ शकत होता.

एके दिवशी चरत असताना दोन्ही शेळ्या नदीकाठी पोहोचल्या. दोघांनाही नदी ओलांडून जंगलाच्या दुसऱ्या भागात जायचे होते. पण पुलाची रुंदी अरुंद असल्याने, एका वेळी फक्त एकच शेळी त्यातून जाऊ शकत होती, परंतु दोघेही मागे हटण्यास तयार नव्हते. यावर एक शेळी म्हणाली, आधी मला जाऊ दे, माझ्यानंतर तू पूल ओलांड. यावर दुसरी शेळी म्हणाली. 'नाही, आधी मला पूल ओलांडू दे, मग तू पूल ओलांडू शकतेस.' हे म्हणत असताना दोन्ही बकरी पुलाच्या मध्यभागी पोहोचल्या व भांडत होत्या. पहिल्या बकरीने म्हटले, 'मी आधी पुलावर आले, म्हणून मी आधी पूल ओलांडेन.' मग दुसऱ्या शेळीने लगेच उत्तर दिले, 'नाही, मी आधी पुलावर आले, म्हणून मी आधी पूल ओलांडेन.' त्यांचे भांडण वाढले.

या दोन्ही शेळ्यांना ते ज्या पुलावर उभे होते तो किती अरुंद होता हे अजिबात आठवत नव्हते. भांडत असताना, दोन्ही शेळ्या अचानक नदीत पडल्या आणि त्यांचा मृत्यू झाला.

तात्पर्य : भांडण केल्याने कोणाचेही चांगले होत नाही उलट, ते सर्वांनाच नुकसान पोहोचवते.



## जीवन का अमृत (भाग १)

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

तक उचित है। इस रास्ते पर मन को काबू में करना पड़ता है। आपने केवल इस बात की चर्चा की है कि आप पाँच नामों का जाप करते हैं। अगर आप अपनी डॉयरी (आत्म-निरीक्षण) भेजते, चाहे खाली ही 'सही और अपनी मुश्किलों के बारे में बताते, तो आपकी सभी कमियों और मुश्किलों से आपको अवगत करा दिया जाता, ताकि भविष्य में आपका मार्गदर्शन हो पाता। भजन-सिमरन में असफलता बहुत सी

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

अपवित्रता के विचारों से एक नशेड़ी जैसा व्यक्ति हम बन जाते हैं। जैसे शराबी शराब के बिना तड़फता है। ऐसे ही व्यक्ति काम विकार के कारण बेचैन रहता है और अपराध कर बैठता है। अपवित्रता का मूल कारण है प्यार की कमी। हरेक व्यक्ति को मन में स्नेह देते रहो उन्हे मन में अपना भाई या बहिन समझो तो अपवित्रता परेशान नहीं करेगी। कोई भी नाकारात्मक विचार मबना देता है और हमारे व्यक्तित्व को बांध देता है। इसलिये सदैव कोई ना कोई अच्छा विचार मन में रखो। मैं कल्याणकारी हूं यह विचार मन में रहे तो कोई भी नाकारात्मक विचार नहीं आयेगा।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'गरज, क्षमता...'

कोणत्याच व्यक्तीची अथवा वस्तुची गरज नाही अशी व्यक्ती ह्या भूतलावर सापडणार नाही. गरज ही शोधाची जननी आहे असं म्हणतात. एखाद्याला एखाद्या वस्तुची गरज असते तर दुसऱ्याला पोटभर अन्नाची गरज असते. तिसऱ्याला एखाद्या व्यक्तीची गरज असते तर चौथ्याला आराम ाची आणि पाचव्याला पैश्यांची गरज असते. गरजवंत पैश्यांसाठी काहीही करायला तयार असतो हे अनेकदा वर्तमानपत्रातील बातम्या वाचून समजतं. एखादी गरज असणं, अमर्याद गरजा असणं हे वेगळं. खरं तर गरजा कमी करणं ही आजच्या काळाची गरज आहे. गरजा कमीत कमी तर सुख, समाधान अधिकाधिक. पण पैश्यांमागे वेड्यासारखं धावणाऱ्या व्यक्तीला जगण्यासाठी किती पैश्यांची गरज आहे हे लक्षात येत नाही. माझ्याकडे जास्तीत जास्त पैसा असावाच ही माझी अत्यंत गरज आहे असं समजुन मी जेव्हा वागु लागतो तेव्हा रक्तनात्याच्या व्यक्तींचाही विचार मी करत नाही कारण त्या क्षणी मला, म णसांपेक्षाही जास्त महत्वाचा, गरजेचा फक्त आणि फक्त पैसाच आहे असं वाटतं.

पैश्यांची हिच हावरुपी गरज प्रसंगी माझा जीव घेते, आरोग्याची नासडी करते. मग कमावलेल्या पैश्यांचा उपयोग आरोग्य सुधारण्यासाठी करावा लागणार आहे. काहीजण गरजेपोटी आपल्या पुढे-पुढे करतात, ऊगाचंच आपलं कौतुक करतात, आपल्याला फार जवळचा आहे असं दाखवतात किंवा भेटवस्तु देऊन आपल्याला खुश करतात. त्यांची गरज भागली की ते आपल्याकडे पुन्हा येत नाहीत. गरज भागली की नातं तोडायचं ही काही व्यक्तींची सवयच असते. ह्यामुळे काय साध्य होतं ह्याचा विचार मी केलाच पाहिजे. काही व्यक्ती ह्या अगदी नियमितपणे अगदी अर्ध्या रात्रीही एखाद्या गरजुच्या पाठिशी निस्वार्थपणे उभ्या राहतात, हे आपण ओळखायला पाहिजे. अशा व्यक्तींप्रति कृतज्ञता व्यक्ती केली पाहिजे. त्यांच्या ह्या औदार्याला सलाम केलाच पाहिजे. निस्वर्था भावनेनं कार्य करणाऱ्या व्यक्ती पाहायला मिळत नाहीत. आपल्या कुटुंबातल्या सदस्याची काय गरज आहे हे आपण समजुन घेऊन, त्याची गरज पूर्ण करता येणं मला शक्य असेल तर ते मी केलंच पाहिजे.

स्वतःची अथवा घरातील सदस्यांची अथवा मित्र अथवा नातेवाईक ह्यांची गरज पूर्ण करण्यासाठी आपल्यातील शारिरिक आणि मानसिक क्षमता ओळखणं तेवढंच महत्वाचं आहे. समजा एखाद्या नातेवाईकाला एक लाख रुपयांची गरज आहे आणि आपल्याकडे पन्नास हजार रुपये आहेत तर आपण जास्तीत जास्त पन्नास हजार रुपयेच देऊ शकतो. ही क्षमता आपण ओळखलीच पाहिजे. सर्वात म हत्वाचं म्हणजे माझी शारिरिक, मानसिक क्षमता मी ओळखलीच पाहिजे. समजा माझी एखादी गरज पूर्ण करण्यासाठी, माझी शारिरिक, मानसिक क्षमता मला माहती असणं गरजेचं आहे. ती लक्षात घेऊन, माझी ती गरज मी पूर्ण करण्यासाठी मी काय काय करणं गरजेचं आहे हे समजलंच पाहिजे. स्वतः सह मित्र, नातेवाईक परिचित ह्यांची गरज अथवा गरजा पूर्ण करणं हे आपलं कर्तव्य आहे,

आपली जबाबदारी आहे. प्रत्येक व्यक्तीची शारिरिक, मानसिक क्षमता वेगवेगळी असते. शारिरिक आणि मानसिक क्षमता वाढवण्यासाठी नेमकं काय काय करणं गरजेचं आहे, हे अभ्यासांती लक्षात येईलंच. अथवा इतरांना विचारुन त्यावर अंमलबजावणी करता येईलंच. वयोमापरत्वे क्षमता कमी अधिक असते.

माझी एखादी गरज पूर्ण करण्यासाठी जेव्हा माझ्या क्षमतांना मर्यादा येते तेव्हा इतरांची गरज पडते. समोरच्याने आपली सदर गरज पूर्ण करतांना आपला स्वभाव, राहणीमान, आवड, छंद, ह्यांसह अनेक बाबींचा विचार समोरच्याकडुन केला जाऊ शकतो. म्हणूनच मनापासून बोलणारे चार शब्द, प्रसन्न - आनंदी चेहरा, इतरांसोबत चांगलं वागणं, बोलणं, महत्वाचं आहे. अर्थातच आपली गरज, जी दुसऱ्यांवर अवलंबुन आहे त्या गरजेची पूर्तता, तेव्हा आपल्याला चांगल्या अर्थाने बदलण्याची संधी आहे असं म्हणता येईल. आपल्यातली शारिरिक, मानसिक क्षमता, मला वाटणं, आपण नक्कीच वाढवु शकतो. गरजेतुनच शोध लागतात. आपली नेमकी गरज काय आहे, ह्यावर सुध्दा बरंच काही अवलंबुन आहे. खरं तर गरज अथवा गरजा ह्या कधीच संपत नसतात. जास्त गरजा अर्थात जास्त त्रास. कमीत कमी गरजा तर समाधान भरपूर. दैनंदिन जगण्यासाठी नेमकं काय काय लागतं हे समजलं की गरज नेमकी कशाची आहे हे लक्षात येतं. झाडं लावणं, झाडं जगवणं ही आज काळची गरज आहे.

(लेख क्र.५५८)

**- सुनील राऊत** माळीगल्ली,
भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

**गणू :** तू आज डॉक्टरांकडे जाणार होतास, काय झाले?

**मनू :** अरे उद्या जाईन, आज तब्येत जरा बरी नाही

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❊ कोणत्या देशात जगातील सर्वात लांब काचेचा पूल बांधलेला आहे?

- व्हिएतनाम

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### बौद्धिक विकास कसा करावा?

कशाचे चित्र आहे, हे बाळाला चित्र दाखवता समजावून सांगावे. उदा. समजा हत्तीचे चित्र दाखविले, तर त्या वेळी हत्ती हा शब्द उच्चारावा. यामळे बाळा काळ्या रंगाचा विशाल हत्ती असतो, हे हळूहळू लक्षात येईल. चित्र दाखविण्याची, अक्षरे दाखविण्याची, खेळणी दाखविण्याची प्रक्रिया वारंवार दिवसातून तीन वेळेला करावी. पहिले सात दिवस दोन-तीन प्रकारची खेळणी अथवा चित्र दाखवावे. नंतर पुढील आठवड्यात दुसऱ्या प्रकारची खेळणी घ्यावी. कारण बाळाला एकच एक खेळणी अथवा चित्र आवडत नसते. सुरुवातीला बाळ कोणतीच प्रतिक्रिया देणार नाही,

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# रेसिडेन्सीयल कन्स्ट्रक्शन व त्यामधील बारकावे








'घर पहावे बांधून व लग्न पहावे करून..'अगदी या उक्तीप्रमाणेच घर बांधणे हे वाटते तितके काही सोपे नाही बरं का? व याची प्रचिती तर किंबहुना सर्वसामान्यांना आहेच. यासाठीच मी काही महत्वाच्या व छोट्या-मोठ्या बाबी ज्या निश्चितच घर अथवा बिल्डिंग बांधण्यास उपयुक्त ठरतील व जेणेकरून काम हे अधिक सुपिरियर, बिनचूक, मर्यादित खर्चआणि अपेक्षित वेळेत पूर्ण होण्यास मदत होईल.

(तत्पूर्वी) घर वा इमारतीच्या वादांमधे उद्भवणारे काही संभाव्य मुद्दे ...

✻ इमारत किंवा बांधकाम कामात विलंब

✻ खराब किंवा चुकीचा संवाद

✻ बांधकाम कामात निष्काळजीपणा

✻ कामाचा खराब दर्जा

✻ चुकीच्या पद्धतीने केलेला करार

✻ अतिक्रमित असलेले अथवा झालेले बांधकाम

✻ पेमेंट (कमी अथवा जास्त केल्यामुळे आलेल्या अडचणी)

बांधकाम करताना अनेक गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे त्यात जागेची निवड (प्लॉट), नियोजन, अंदाजपत्रक, साहित्य निवड, सुरक्षा आदी नियमाचे पालन यांचा समावेश होतो.

**जागेची निवड :** घरासाठी जागा निवडताना जमिनीचा पाया, पाण्याची उपलब्धता तसेच लाईट, ड्रेनेज सिस्टीम व परिसरातील इतर सोयीसुविधा आणि सुरक्षितता यासारख्या गोष्टी प्रामुख्याने विचारात घ्याव्यात.

**नियोजन :** बांधकामाचे चालू करणेपूर्वी तपशीलवार नियोजन करणे आवश्यक आहे जसे की नकाशा (प्लॅन) व यासाठीच तज्ञ व कुशल आर्किटेक्ट, भुकपरोधक कामासाठी आर. सी.सी डिझायनर व तसेच साईटवर जातीने लक्ष देऊन काम करवून घेणारा प्रामाणिक इंजिनियर याची अति आवश्यकता असते.

**अंदाजित खर्च :** बांधकामासाठी लागणारा अंदाजित खर्च निश्चित करणे हे महत्वाचे आहे यामधे बांधकाम साहित्य (मटेरिअल), मजुरी आणि इतर खर्च सामविष्ट आहेत.

**बांधकाम साहित्य निवड :** मजबुत व टिकाऊ बांधकाम साहित्याची निवड करणे आवश्यक आहे यात प्रामुख्याने विटा, सिमेंट, स्टील आणि इतर आवश्यक साहित्याचा सामावेश आहे.

**सुरक्षा :** बांधकाम सुरू असताना सुरक्षा नियमाचे पालन करणे आवश्यक आहे. यात कामगारांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करणे आणि अपघात टाळणे यांचा सामावेश असून संबधित सर्व ठेकेदारसमवेत सूरक्षेविषयक करार करणे अति महत्वाचे आहे.

**नियमाचे पालन :** बांधकाम करताना स्थानिक नियमाचे पालन करणे आवश्यक आहे यात रीतसर परवानगी घेणे आणि सर्व बांधकाम नियमानुसार करणे यांचा समावेश आहे.

**गुणवत्ता :** बांधकामाची गुणवत्ता राखणेही महत्वाचे आहे. यात योग्य साहित्याचा वापर, कुशल कामगार (skilled labour) आणि बांधकामावर पूर्णत लक्ष ठेवणे याचा सामावेश आहे.

**वेळेचे व्यवस्थापन :** बांधकाम वेळेवर पूर्ण करण्यासाठी योग्य नियोजन जसे की सर्व प्लॅनिंग आधीच फायनल करणे गरजेचे आहे यामुळे फेरकामासाठी अथवा दुरुस्तीसाठी लागणारा वेळ हा तर वाचतोच तसेच होणारी अतिरिक्त नुकसान वाचण्यास मदत होते.

**खर्च नियंत्रण :** बांधकामाचा खर्च नियंत्रित ठेवण्यासाठी खर्चाचे योग्य नियोजन व यासाठीच सर्व स्पेसिफिकेशन सह (उदा. स्ट्रक्चरल व फिनिशिंग आयटम ई.) हे आगाऊ व लिखित स्वरुपात फायनल व नियोजन केल्यास निश्चितच अतिरिक्त वाढीव खर्चास आळा बसण्यास सहाय्य होईल.

**देखभाल :** बांधकामाची, इमारतीची नियमित स्वरूपात देखभाल करणे आवश्यक आहे जेणेकरून ते दीर्घकाळ टिकेल.

**बांधकाम कराराचे महत्व :** बांधकाम करार हा एक लेखी दस्तावेज असतो ज्यामधे घर मालक व कंत्राटदार दोघांनीही मान्य केलेल्या सर्व गोष्टींचा समावेश असतो. त्यात कराराच्या अटी व शर्ती, दोन्ही पक्षाच्या जबाबदाऱ्या, देय रक्कम (पेमेंट शेड्युल), काम सुरू होण्याची तारीख आणि पूर्ण होण्याची अपेक्षित तारीख ही काळजीपूर्वक नमुद केली जाते. साईटवर नियुक्त केलेला इंजिनियर हा ही जबाबदारी व्यवस्थित रित्या पार पाडू शकतो व यामुळे मालकाच्या होणाऱ्या संभाव्य नुकसानीस निश्चितच आळा बसतो.



कोणत्याही प्रकारचे बांधकाम करायचे असल्यास एक व्यवस्थित लिहिलेला करार असणे अत्यंत आवश्यक आहे कारण..

✻ गृहनिर्माण कायद्यात ते आवश्यक आहे

✻ हे मालक व कंत्राटदार दोघांच्याही हक्काचे रक्षण करते.

✻ सुनिश्चित करते की मालकाच्या योजना व अटी स्पष्टपणे मांडल्या आहेत

✻ सुनिश्चित करते की मालक आणि कंत्राटदार एकाच दिशेने आणि एकाच ध्येयाने काम करत आहेत.

**आमचेविषयी :** 'एम. एस. कन्स्ट्रक्शन व कॉन्ट्रॅक्टर'ही फर्म गेल्या १०-१२ वर्षापासून बांधकामात आहे. आमच्या फर्म मार्फत रेसिडेन्सीयल बंगलो (प्रायव्हेट), रो हाऊसिंग, बिल्डिंग वर्क्स (पी. एम. सी. सुपा), एम.आय.डी.सी. मधील कामे व तसेच स्पेशली सर्व प्रकारची फेन्सिंग, वॉल कंपाऊंड व वॉटरप्रूफिंग ची सुद्धा कामे ही दर्जेदार व विश्वासाहर्तेने घेऊन पूर्ण करून वेळेत ताब्यात दिली जातात.

धन्यवाद.

**- इंजि. महेश आय. संकलेचा**
D.C.E. **मो: ७५८८५४००१०**
mahesh.mksanklecha@gmail.com
**ऑफिस - एफ ६, गिरीधर अपार्टमेंट, भवानीनगर, अहिल्यानगर, ४१४००१.**

आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर
www.aesanagar.com
AESA

## श्री स्वामी समर्थ अभ्यास केंद्रात ब्युटी पार्लर मॅनेजमेंट, जर्मन भाषा, डिप्लोमा इन कॉम्प्युटर हार्डवेअर कोर्स सुरु

नगर - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ मार्फत नगर येथील श्री स्वामी समर्थ अभ्यास केंद्राला मान्यता मिळाली असून त्यात जर्मन भाषा, ब्युटी पार्लर मॅनेजमेंट, डिप्लोमा इन कॉम्प्युटर हार्डवेअर, कोर्स शिकवले जाणार असल्याचे श्री स्वामी समर्थ अभ्यास केंद्राच्या संचालिका डॉ.माया उंडे यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरसाठी उपयुक्त असणारे हे कोर्सेस असणार आहे. सदर कोर्सचे कोंबडीवाला मळा, सोलापूर रोड, अहिल्यानगर येथे असणार आहे. कोर्सच्या अ‍ॅडमिशन साठी त्वरित संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी संपर्क ९४२३७ ९२६६८.




# नगरमध्ये सव्वा रूपयांत सामुदायिक विवाह सोहळा

### सावेडीतील श्री श्रमिक बालाजी सामाजिक संस्था ट्रस्टचा उपक्रम


नगर - सावेडीतील श्रमिकनगर येथील श्री श्रमिक बालाजी देवस्थानच्या ३२ व्या वार्षिक महोत्सवानिमित्त श्री व्यकंटेश्वर कल्याणम सोहळा ४ ऑगस्ट रोजी दुपारी १.१८ वाजता होणार आहे. या सभामंडपात सव्वा रूपयात सामुदायिक विवाह सोहळा आयोजित केला आहे.

या सोहळ्याचा लाभ हिंदू धर्मातील सर्व जातीच्या वधू वरांना घेता येईल. सोहळ्याचा उपक्रम संस्थेच्या वतीने श्री श्रमिक बालाजी मंदिरात करण्यात येईल. या सामुदायिक विवाहात वधू वरांनी सहभाग घ्यावा. २० जुलै पर्यत श्री श्रमिक बालाजी मंदिरात सायं ६ ते ९ या वेळेत नाव नोंदवावीत असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी नगरसेवक मनोज दुल्लम ९२२५७००००७, विनोद म्याना ९८५०६७७७७४, नारायण यन्नम ९४२०८०२०१०.




## ज्ञानसंपदा शाळेतील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



श्रीनील वागस्कर    शुभम सानप    अंशुल मुत्याल

नगर - महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे अंतर्गत पूर्व उच्च प्राथमिक इयत्ता पाचवी व पूर्व माध्यमिक इयत्ता आठवी वर्गासाठी २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांमध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत सावेडीतील तपोवन रोडवरील ज्ञानसंपदा शाळेतील ३ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. यामध्ये प्रथम भाषा गणित तृतीय भाषा व बुद्धिमत्ता चाचणी या विषयावर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांनी याचा सखोल अभ्यास करत या शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले.

(इयत्ता पाचवी) श्रीनिल कचरू वागस्कर याने ७५ शेकडा गुण प्राप्त करत यश मिळवले. (इयत्ता आठवी) शुभम सोमनाथ सानप यानी ७० शेकडा गुण मिळवला. तर (इयत्ता आठवी) अंशुल श्रीनिवास मुत्त्याल ७५ शेकडा गुण प्राप्त करून सुयश मिळविले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बजाज, उपाध्यक्ष मिलिंद गंधे, मानद सचिव अरुण कुलकर्णी, खजिनदार अविनाश बोपर्डीकर, स्कूल कमिटी चेअरमन कारभारी भिंगारे, मुख्याध्यापिका सौ.शिवांजली अकोलकर, शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचा गौरव करून शुभेच्छा दिल्या.




# जास्तीत जास्त मोफत त्वचा आरोग्य शिबिरे आणि त्वचा, केस, नखे आणि गुप्तांगाच्या समस्या यांच्या जागरूकतेसाठी आंतरराष्ट्रीय विक्रम करण्याचा प्रयत्न

**१३ जुलै रोजी संपूर्ण भारतात आरोग्य IADVL चा एक ऐतिहासिक उपक्रम**

IADVL म्हणजे इंडियन असोसिएशन ऑफ डर्मेटोलॉजिस्ट, व्हेनेरिओलॉजिस्ट अ‍ॅण्ड लेप्रोलॉजिस्ट आहे. १८२०० हून अधिक सदस्यांसह भारतातील सर्वात मोठी आणि जगातील दुसरी सर्वात मोठी त्वचारोगतज्ज्ञ संघटना वर्षभर वैद्यकीय शैक्षणिक कार्यक्रम, प्रमाणपत्र अभ्यासक्रम आयोजित करून आपल्या सदस्यांना सतत प्रशिक्षण देते आणि कौशल्ये वाढवते. ही संस्था त्वचा आरोग्य जागरूकता निर्माण करून मोफत त्वचा आरोग्य शिबिरे आयोजित करून समुदायाची सेवा करण्यास वचनबद्ध आहे. १३ जुलैला **'त्वचेच्या आरोग्याशिवाय आरोग्य नाही'** या जागतिक थीमशी सुसंगत राहून, संपूर्ण भारतात ह्या संस्थेद्वारे ५५० हून अधिक मोफत त्वचा आरोग्य शिबिरे घेण्यात येणार आहेत. भारतीय त्वचारोग संघटना या जागतिक त्वचा आरोग्य दिनानिमित्त जनसामान्यांना त्वचा, केस किंवा नखांच्या कोणत्याही समस्यांसाठी केवळ पात्र म्हणजेच त्वचारोगाची पदवी असलेले एमबीबीएस, एमडी, डीडी व्ही, डीव्हीडी, डी डी व्ही एल, डीएनबी पदव्युत्तर त्वचारोगतज्ज्ञांकडूनच सल्ला घेण्याचे आवाहन करते. कारण निरोगी त्वचा ही तुमच्या शरीराचा आरसा आहे. म्हणून या अनुषंगाने त्वचेचे आरोग्यही महत्त्वाचे असून त्याचा परीणाम एकूणच शारीरिक, मानसिक आणि सामाजिक बाबींवर होत असतो त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही हे समाजामध्ये पटवून देणे आहे.

**मुख्य संदेश : निरोगी शरीर व निरोगी राष्ट्रासाठी निरोगी त्वचा आवश्यक आहे.**

त्वचेचे आजार केवळ शारीरिक स्वरूपावरच परिणाम करत नाहीत तर मानसिक आरोग्य, लैंगिक आरोग्य, सामाजिक सहभाग आणि एकूणच जीवनमानावरही लक्षणीय परिणाम करतात.

**आयएडीव्हीएल त्वचारोगतज्ज्ञ त्वचेच्या आरोग्याचे विश्वासू संरक्षक आहेत.**

त्यांना त्वचा, केस, नखे आणि जननेंद्रियांच्या विकारांचे निदान आणि उपचार करण्यासाठी प्रशिक्षित केले जाते,

**टॉपिकल स्टिरॉइड क्रीम ही प्रिस्क्रिप्शन औषधे आहेत.**

कॉस्मेटिक किंवा फेअरनेस उत्पादने नाही. त्यांचा गैरवापर केल्यास गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात, ज्यात हे समाविष्ट आहे: त्वचा पातळ होणे (शोष), स्ट्रेच मार्क्स (स्ट्राय), रोसेसिया, पुरळ, पेरीओरल डर्माटायटीस, हायपरट्रिकोसिस, रंगद्रव्य बदल जखमा बऱ्या होण्यास उशीर होणे आणि दाद (टिनिया) सारख्या बुरशीजन्य संसर्गाची तीव्रता वाढणे, जे प्रामुख्याने स्टिरॉइडच्या गैरवापरामुळे साथीच्या प्रमाणात पोहोचले आहे.

**निरोगी त्वचेचा पाया संतुलित आहार, नियमित शारीरिक हालचाली आणि योग्य त्वचेची काळजी यामध्ये आहे.**

स्वतःहून औषधोपचार करणे आणि अनियंत्रित सौंदर्यप्रसाधन पद्धती टाळा.

**जुन्या गैरसमजुतींपासून रूढीपरंपरांपासून स्वतःला दूर ठेवा**

त्वचारोग, सोरायसिस, कुष्ठरोग आणि एचआयव्ही / एड्स सारखे आजार स्पर्शाने पसरत नाहीत, चला तर दूर करूया या जुनाट गैरसमजुती आणि देऊया आधार रुग्णांना योग्य तो उपचार करून.

**सर्वच पांढरे डाग त्वचारोग नसतात.**

आजाराचे अचूक निदान महत्वाचे असते. कोड असलेले लोक पूर्णपणे सामान्य शारीरिक, लैंगिक आणि सामाजिक जीवन जगू शकतात.

**सोरायसिस ही एक सामान्य, उपचार करतायेणारा आजार आहे**

मात्र लवकर निदान करून उपचार सुरू करणे अत्यंत महत्त्वाचे. कारण सोरायसिस त्वचेवरच नव्हे तर शरीरातील अवयांवर जसे की सांधे, यकृत, मूत्रपिंड आणि हृदय यावर परिणाम करू शकतो. सोरियासिसचे उशिरा निदान झाल्यास किंवा अपुरा उपचार केल्यास त्वचेचा हा आजार तुमच्या अवयांना पोखरु शकतो.'

**कुष्ठरोग हा कुठलाही शाप नाही तर तो बरा होणारा जिवाणूजन्य आजार आहे.**

मायकोबॅक्टेरियम लेप्रे या जीवाणूमुळे होणारा हा आजार लवकर निदान केल्यास त्यावर उपचार करणे सोपे होते ज्यामुळे मज्ञातंतूंचे नुकसान आणि विकृती टाळण्यास मदत होते .

**एचआयव्ही/एड्स हा एक आटोक्यात येणारा दीर्घकालीन आजार आहे.**

अँटीरेट्रोव्हायरल थेरपी (एआरटी), पौष्टिक आहार आणि वैद्यकीय देखरेखीचे पालन केल्याने एचआयव्ही ग्रस्त लोकही दीर्घ आणि निरोगी आयुष्य जगू शकतात. म्हणून **''एड्स हा मृत्युदंड नाही, तो एक दीर्घकालीन आजार आहे ज्याला योग्य उपचारांनी आटोक्यात ठेऊ शकतो.''**

याप्रसंगी, IADVL जनतेला त्वचा, केस किंवा नखांच्या कोणत्याही समस्यांसाठी केवळ पात्र त्वचारोगतज्ज्ञांकडूनच सल्ला घेण्याचे आवाहन करते.


चला तर मग एकत्रितपणे, आपण असे राष्ट्र निर्माण करूया जिथे त्वचेच्या आरोग्यालाही महत्त्वाचे स्थान असेल. **कारण निरोगी त्वचा आपल्या जीवनाला सक्षम बनवते.**

**चला तर मग निरोगी त्वचा, निरोगी शरीर आणि निरोगी राष्ट्रनिर्मितीच्या दिशेने एकत्र काम करूया**

सार्वजनिक हितासाठी जारी करत आहे : अहिल्यानगर डर्माटोलॉजीस्ट सोसायटी अहिल्यानगर

**- डॉ. राजीव सूर्यवंशी (सचिव)**

कॅम्प : १३ जुलै, वेळ : सकाळी ११ ते २,
(स्थळ : सिव्हील हॉस्पीटल जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर)



## तिळवण तेली समाज ट्रस्ट, अहिल्यानगर

श्री.विठ्ठल रुक्मीणी मंदिर, तेली समाज, पंच वाडा, अ.नगर

### जाहीर प्रकटन

सर्व अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, शहर सावेडी उपनगर, केडगाव व भिंगार हद्दीतील तिळवण तेली समाजातील तसेच बाहेरगावावरुन आलेले परंतु अहिल्यानगर शहरात कायमस्वरुपी स्थायिक झालेले समाज बांधवांनी सामील व्हावे. सर्व व्यक्तींना कळविण्यात येते की, मा.धर्मदाय उपायुक्त अहिल्यानगर यांनी चौ.अ.क्र.५६२/२०२५ मध्ये दि.११.०६.२०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार ''तिळवण तेली समाज ट्रस्ट'' अे-४६३ अ.नगर या न्यासाच्या सन २०२५ ते २०२८ या कालावधीसाठी विश्वस्त निवड करणेकामी, मतदान करण्यास इच्छुक असणाऱ्या १८ वर्ष वयाच्या पुढील स्त्री, पुरुष व्यक्तींनी मतदार यादीत नाव नोंदणी करणेसाठी दि.१३.०७.२०२५ ते दि.२०.०८.२०२५ या कालावधीत नाव नोंदणीसाठी नावे नोंदणी करण्याचे काम चालू होणार आहे. तरी मतदान करण्यास इच्छुक असणाऱ्या फक्त तिळवण तेली समाजातील १८ वर्ष वयाच्या पुढील स्त्री, पुरुष व्यक्तींनी दुपारी ३ ते ६ वाजेपर्यंत ''तिळवण तेली समाज ट्रस्ट'' अे-४६३ अ.नगर यांच्या ट्रस्टच्या आवारातील श्री. विठ्ठल रुक्मीणी मंदिर, तेली समाज पंच वाडा अ.नगर येथे उपस्थित असलेल्या श्री.हरीभाऊ बाबुराव डोळसे मो.९८२२२७१८०७ तसेच श्री.प्रसाद अर्जुन शिंदे मो.नं.९४२०९४११११ यांच्याकडे नाव नोंदणी करावी. सदर नाव नोंदणीच्या काळात नाव नोंदणी झालेल्या व्यक्तींची अंतिम यादी मा.उपधर्मादाय आयुक्त अ.नगर यांच्या कार्यालयात सादर करण्यात येईल. त्यानंतर सदर यादीच्या अनुषंगाने व मा.उपधर्मादाय आयुक्त अ.नगर यांनी दिलेल्या आदेशानुसार व ट्रस्टच्या मंजुर घटनेनुसार सन २०२५ ते सन २०२८ या कालावधीसाठी विश्वस्त व पदाधिकारी निवडीचा कार्यक्रम दैनिक वर्तमानपत्र व न्यासाच्या कार्यालयात प्रसिध्द केला जाईल. तरी तिळवण तेली समाजातील १८ वर्ष वयावरील पात्र मुले, मुली, स्त्री, पुरुष यांना विनंती करण्यात येते की, दिलेल्या मुदतीत अ.नगर महानगरपालिका हद्दीतील व उपनगर, केडगाव, भिंगार हद्दीतील समाज बांधवांनी जास्तीत जास्त नाव नोंदणी करण्यात यावे ही विनंती.

दि.१२/०७/२०२५
ठिकाण- अहिल्यानगर

जाहीर प्रकटन करणार
**श्री.हरीभाऊ बाबुराव डोळसे**
विश्वस्त, तिळवण तेली समाज ट्रस्ट, मो : 9822271807

# भाऊसाहेब फिरोदियाचे ४१ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत

### शाळेच्यावतीने गुणवंतांचा सन्मान



भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमधील विद्यार्थ्यांनी राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक शष्यवृत्ती (इयत्ता ८ वी) परीक्षेत यश संपादन केले.

नगर – अ.ए.सो. च्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल मधील विद्यार्थ्यांनी राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक शष्यवृत्ती (इयत्ता ८ वी) परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. इयत्ता ५ वीचे २५ विद्यार्थी तर इयत्ता ८ वीचे १६ विद्यार्थी जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत चमकले.

विद्यार्थ्यांनी शाळेच्या निकालाची उज्वल परंपरा या वर्षीही कायम राखली असून, या गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेत संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक उल्हास दुगड, उपमुख्याध्यापक कैलास साबळे, पर्यवेक्षक बाळासाहेब वाव्हळ, वैभव कुलकर्णी आदींसह मार्गदर्शक शिक्षक उपस्थित होते.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती (इयत्ता ५ वी) परीक्षेत जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत वेदांत दैठणकर, विराज गाढे, शिवराज म्हस्के, धीरज गुंड, शौर्य जठार, वेदांत भोत, कार्तिकी हारके, प्रज्वल सत्रे, श्रद्धा पालवे, तेजस्विनी मोरे, नंदनी पवार, साबिरअली तांबोळी, नेत्रा देशमुख, युवराज पाटोळे, अक्षरा तुंगीकर, सोहम ससे, विराज चोथे, श्रेया सायकवाड, आर्यन सत्रे, पार्थ ढोले, विराज शेलार, आरव मोरे, गौतमी भिंगारदिवे, वरदराज रोडे, आयुष लयशेट्टी यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना वैशाली मेहेर, बाळासाहेब पालवे, अतुल बोरुडे, शितल डिमळे, अपर्णा कमलकर, मीनाताई साबळे, सविता जासूद, मंजुषा शिवगुंडे यांचे मार्गदर्शन लाभले.

पूर्व माध्यमिक शष्यवृत्ती (इयत्ता ८ वी) परीक्षेत जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत आदित्य धस, शंतनु घोडके, सोहन शिंदे, संस्कृती पांडुळे, मनस्वी लवटे, ज्ञानेश्वरी गावडे, आयुष बोरुडे, अनुष्का भनभने, आकाश शेलार, अथर्व पैठणकर, कार्तिक गुंड, राजलक्ष्मी घडेकर, कार्तिकी शेळके, अक्षरा फुलसौंदर, दिव्या पटवा, संस्कृती आनंदकर यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना प्रगती बेगडे, अतुलकुमार पटवा, राजलक्ष्मी कुलकर्णी, शिल्पा नगरकर, सुलभा कुलकर्णी, अंजली गोले, सुषमा मुदगल, वैभव पडोळे यांचे मार्गदर्शन लाभले.

छायाताई फिरोदिया यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन गुणवत्ता टिकवून भवितव्य घडविण्याचे सांगितले.

संस्थेचे सहकार्यवाह गौरव फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, खजिनदार प्रकाश गांधी यांनी गुणवंत विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले.

# राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने नगरचे वसीम शेख सन्मानित



वसीम शेख यांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.



नगर – नुकत्याच शिर्डी येथे पार पडलेल्या कार्यक्रमात शहरातील शिक्षक वसीम शेख यांना सन्मान पत्र, शाल, फेटा बांधून गौरविण्यात आले. ते स्टॅमिना स्पोर्टस् अॅकॅडमी फाऊंडेशनचे अध्यक्ष व संचालक आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ते क्रीडा, शिक्षण, सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांचे शालेय शिक्षण कॉन्व्हेंट इंग्रजी माध्यम, अहमदनगर महाविद्यालय येथे पदव्युत्तर शिक्षण झालेले आहे. मराठवाडा विद्यापीठाची त्यांनी शिक्षक पदवी उत्तीर्ण झालेले आहेत.

आकाशवाणी अहमदनगर तर्फे त्यांना युथ आईकॉन व सर्वश्रेष्ठ खेळाडुचा पुरस्कार प्रदान करण्यात आला व त्यांना युवा पिढीला मार्गदर्शनासाठी बोलावले. त्यांनी स्वत: अनेक स्पर्धा गाजवल्या आहेत. कराटे, बॉक्सिंग व विद्यापीठ स्पर्धेत वेटलिफ्टिंग, पॉवर लिफ्टिंग, शरिर सौष्ठव, एन.सी.सी. राज्य, राष्ट्रीय, विद्यापीठ स्पर्धेक चमक दाखवत ऑलराऊंडर शिक्षक म्हणून ख्याती मिळवली आहे. त्यांनी घडवलेले अनेक विद्यार्थी पोलिस, सैन्य, एमपीएससी, एसआरपी मध्ये सेवा करत आहे. आजही ते हातमपुरा येथे अॅकॅडमी चालतव आहे व इंग्लिश स्पोकन चालवत आहे. या सर्व कामगिरीची दखल घेऊन त्यांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ आदर्श गावचे सरपंच पोपट पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



श्री गणेश दत्त देवस्थान ट्रस्ट आणि संदीप कोतकर युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने भूषण अशोक गुंड यांच्या पुढाकारातून ज्येष्ठ शिक्षकांच्या सन्मान करण्यात आला.

# गुरुंशिवाय जीवन खडतर : भूषण गुंड

### केडगावात गुरुपौर्णिमेला ज्येष्ठ शिक्षकांचा सत्कार

नगर – शिक्षक हा आदर्श समाजाचा पाया आहे. शिक्षकांच्या माध्यमातून भावी पिढी घडत असून, त्यांचा सन्मान होणे गरजेचा आहे. जीवनाला दिशा देण्याचे कार्य गुरु करत असतात. गुरुंशिवाय जीवन खडतर असल्याचे संदीप दादा कोतकर युवा मंचचे अध्यक्ष भूषण गुंड यांनी सांगितले.

३५ ते ४० वर्षापासून अविरतपणे ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या ज्येष्ठ शिक्षक-शिक्षिकांचा केडगावात गुरुपौर्णिमेला सन्मान करण्यात आला. या सत्काराने गुरुजन भारावून गेले. श्री गणेश दत्त देवस्थान ट्रस्ट आणि संदीप कोतकर युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने भूषण अशोक गुंड यांच्या पुढाकारातून ज्येष्ठ शिक्षकांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

अंबिकानगर येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या प्रारंभी सरस्वती पूजन करण्यात आले. गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी ह.भ.प. स्वानंद महाराज जोशी यांच्या प्रवचन रंगले होते, त्यांनी प्रवचनातून गुरुचे महत्त्व विशद केले.

उपाध्यक्ष बाबासाहेब राशिनकर यांनी प्रास्ताविकात समाज घडविण्याचे कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान होण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे स्पष्ट केले. नंदकुमार पोळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

मान-सन्मान देऊन केलेल्या सत्काराबद्दल ज्येष्ठ शिक्षकांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी डॉ. शरद कोलते, उद्योजक सागर सातपुते, चेअरमन बापूसाहेब सातपुते, मारुती चोबे, आनंद पाठक, खजिनदार संजय बोरगे, शिरीष होंडे, नंदकुमार पोळ, शरद आचारी, दिलीप शेजुळ, अजित पवार, शारदा शेजुळ, वसुधा देशपांडे, प्रतिमा कुलकर्णी, गौरी ठाणेकर, संजय निक्रड, प्रमोद कुलकर्णी, राजेश देशपांडे आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन ज्ञानेश देशपांडे यांनी केले. प्रमोद शेजुळ यांनी आभार मानले.

# जगदंब फाऊंडेशनचे वंचितासाठींचे कार्य प्रेरणादायी

### राजेंद्र उदागे यांचे प्रतिपादन; एकल महिलांच्या मुलांना दर्जेदार शालेय साहित्य वाटप



जगदंब फाऊंडेशनच्या पुढाकारातून एकल महिलांच्या मुलांना शालेय साहित्य वाटप करताना राजेंद्र उदागे, उराजेंद्र काळे, गणेश लंघे, अशोक कुटे व इतर

नगर – नगर मधील जगदंब फाऊंडेशन हे नेहमी वंचित घटकांसाठी कार्य करत आलेले आहेत. नुकतेच अशोक कुटेंच्या पुढाकारातून एकल महिलांच्या मुलांना मोठ्या प्रमाणात दर्जेदार शालेय साहित्य वाटप करून या मुलांना शिक्षण प्रवाहात टिकून राहण्यासाठी जगदंब फाऊंडेशन अंतर्गत साऊ एकल महिला समिती भरीव कामगिरी करत आहे असे उद्गार शब्दगंध साहित्य परिषदेचे अध्यक्ष व कोहिनूर मंगल कार्यालयाचे संचालक राजेंद्र उदागे पाटील यांनी शालेय साहित्य वाटप करताना काढले.

जगदंब फाऊंडेशनच्या पाईपलाईन रोड भिस्तबाग चौक येथील कार्यालयात हा शालेय साहित्य वाटप व एकल महिलांना, मुलांना मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला. यावेळी फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश लंघे, सचिव अशोक कुटे, जयश्री कुटे, विनोद ढोरजकर, अमोल निंबाळकर, प्रभू कर्डिले, बंडू आहेर आदि उपस्थित होते. तसेच जिजाऊ महिला ग्रुप, छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठानचे सदस्य पदाधिकारी उपस्थित होते. हेरंब कुलकर्णी सरांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या चळवळीमध्ये पूर्ण नगर जिल्हा व राज्यभर शालेय साहित्य वाटप चे सध्या काम चालू आहे असे असे अशोक कुटे यांनी सांगितले

तसेच उराजेंद्र काळे सावेडी मंडल अध्यक्ष भाजपा मनीषा बारस्कर-काळे यांनी देखील जगदंब फाऊंडेशनच्या विनंतीवरून २५ एकल महिलांच्या मुलांना शालेय साहित्य वाटप केले. त्याच वाटप कार्यक्रमात अशोक कुटेंच्या आवाहनानंतर लगेच उद्योजक किरण काळे, प्रसाद कुलकर्णी यांनी पुढील ३५ मुलांना शालेय मदत देण्याचे मान्य करून त्याप्रमाणे निधी दिला. एकल महिलांच्या मुलांची संख्या खूप मोठी आहे. त्यामुळे याप्रमाणे आपणही इतर दात्यांनी स्वइच्छेने पुढे येऊन अश्या निराधार मुलांना मदत केल्यास नक्कीच त्यांना जगण्याची नवीन उमेद मिळेल. मदतीसाठी अशोक कुटे ७४४७७८५९१० यावर संपर्क करावा.









## दि अहमदनगर जैन ओसवाल को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.

१४१८, वंजार गल्ली, अहमदनगर-४१४००१. फोन नं. (०२४१) २३४५४३१

**सन २०२४-२०२५**

रजि.नं. ८६७४ स्थापना: दि. २०/०५/१९४४

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

दि अहमदनगर जैन ओसवाल को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., अहमदनगर या संस्थेची सन २०२४-२०२५ सालाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २७/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. **सॉलीटर बाय बडीसाजन, अरणगांव,अहिल्यानगर** येथे संस्थेचे चेअरमन **श्री.सीए. किरण पोपटलालजी भंडारी** यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे हि नम्र विनंती.

*** वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषय ***

१) मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन स्विकृती देणे.
२) दि. ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या सहकारी वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास स्विकृती देणे.
३) सन २०२४-२५ चे वैधानिक लेखा परिक्षण अहवालास मंजुरी देणे.
४) सन २०२४-२५ चे दोषदुरुस्ती अहवालास मंजुरी देणे
५) सन २०२४-२५ चे मंजूर अंदाजपत्रकापेक्षा कमी/जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
६) सन २०२५-२६ सालाकरीता तयार केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
७) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस स्विकृती देणे.
८) सन २०२५-२६ सालाकरीता वैधानिक लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे.
९) एकरकमी परतफेड योजनेमध्ये दिलेल्या व्याज सवलतीस मंजूरी देणे.
१०) गैरहजर सभासदांच्या अनुपस्थिस परवानगी देणे.
११) मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

स्थळ : अहिल्यानगर
दिनांक : १२/०७/२०२५

**श्री. विलास प्रेमराज गदिया**
व्यवस्थापक
(मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार)

**विशेष सूचना :-**
१) गणसंख्येअभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तीच सभा त्याच ठिकाणी निर्धारित वेळेनंतर अर्ध्या तासाने घेण्यात येईल.
२) सभासदांना सभेपुढे आलेल्या विषयासंदर्भात काही प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी दि. २४/०७/२०२५ पुर्वी लेखी स्वरुपात कार्यालयीन वेळेत संस्थेच्या कार्यालयात दाखल करावीत.
३) **सभेनंतर सुरुची भोजनाची व्यवस्था केलेली आहे.**

## जाहीर नोटीस

तमांम लोकांस कळविणेत येते की, मौजे भिंगार, ता.नगर, जि.अहिल्यानगर येथील अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील शेतजमीन मिळकत याचा सर्व्हे नं.३१/१ क्षेत्र ३ हे.२० आर. यांपैकी ६/७ अविभक्त हिश्याची मिळकत क्षेत्र २ हे.७४.३ आर. ही शेतजमीन **(१)श्रीमती चंद्रभागा फकिरा राउत (२)सतिष फकीरा राउत (३)भरत फकीरा राउत (४)रोहीदास फकीरा राउत (५)सौ शांताबाई देवराम रासकर व (६)सौ.आशाबाई सुरेश खैरनार** यांचे मालकी वहीवाटीची असुन त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना खरेदी देण्याचे ठरवुन रितसर लेखी साठेखत आमचे अशिलांना दि.१५/११/२०१७ रोजी करून दिलेले आहे. सदर साठेखताचे वेळी व त्यांनतरही आमचे आशिलांनी सदर जमीन मालकांना बरीच मोठी रक्कम विसारापोटी व कराराचा भाग म्हणुन दिली आहे. परंतु (१)श्री.नाथु बाबु सानप (२)श्री.महादेव नाथु उर्फ नाथा सानप (३)श्री.मारुती नाथु उर्फ नाथा सानप हे सदर मिळकतीचे कायदेशीर मालक नसतांना या व्यक्तींनी सदरची मिळकत दिनांक १३/०३/२०१८ रोजी (१)श्रीमती आशा शांतीकुमार फिरोदिया (२) सौ.निता अशोक पितळे (३)सौ.राखी नरेंद्र फिरोदिया (४) श्री.गौरव अशोक पितळे (५) श्री.किरण हरिकिसन मणियार यांना बेकायदेशीर खरेदीखताने खरेदी दिलेली आहे. आमचे अशिलांनी सदरची मिळकत त्यांना दिनांक १५/११/२०१७ रोजीचे साठेखताप्रमाणे खरेदी मिळणेकरीता जमीन मालक श्रीमती चंद्रभागा फकिरा राउत वगैरे बेकायदेशीर खरेदी देणार श्री.नाथु बाबु सानप वगैरे व खरेदी घेणार श्रीमती आशा शांतीकुमार फिरोदिया वगैरे यांचे विरुध्द अहमदनगर येथील दिवाणी न्यायालयात स्पे.मु.नं.३/२०१९ चा दावा सदर शेतजमीनीचे खरेदीखत करून मिळणेसाठी व खरेदी घेणार यांचे विरुध्द निरंतर मनाई हुकुम मिळणेसाठी केलेला आहे व त्याचे कामकाज प्रलंबित आहे. सदर साठेखतातील शर्तीप्रमाणे आमचे अशिल या जमीनीचे खरेदीखत करून घेणेस तयार होते व आहे, असे असतांना काही व्यक्ती सदर प्रतिवादींना जास्त पैशांची लालच दाखवुन सदर जमीनीबाबत काही करार करून घेण्याचे विचारात असल्याचे व तसे प्रस्ताव सदर जमीन बेकायदेशीर खरेदी घेणार यांना देत असल्याचे आमचे अशिलांना समजलेले आहे. सदर मिळकतीबाबत या जमीन मालकांनी आमचे अशिलांना लेखी साठेखताचा करार करून दिला असतांना व सदरचा करार अस्तित्वात असतांना दाव्यातील प्रतिवार्दींना दुसरे कोणाही बरोबर सदर जमीनी बाबत कोणताही करार करण्याचा अधिकार नाही. तरी सदर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर परिशिष्टात नमुद मिळकती बाबत सदर जमीनीचे मालक राउत कुटुंबीय व बेकायदेशीर खरेदी घेणार यांचे बरोबर कोणीही साठेखत, खरेदीखत अगर इतर कोणताही करार करु नये. या उपर जर कोणी या दाव्यातील प्रतिवादींकडून सदर मिळकतीबाबत काही करार अगर खरेदीखत केल्यास तो करार/खरेदीखत बेकायदेशीर होईल व सदर करारानुसार/खरेदीखतानुसार या जमीनीत हक्क मिळणार नाही, याची नोंद घ्यावी. कळावे.

**परिशिष्ट**

मौजे भिंगार, ता.नगर, जि.अहिल्यानगर येथील अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील शेतजमीन मिळकत.

| सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ३१/१ | ३-२० | ०=९० |

**यांपैकी ६/७ अविभक्त हिस्सा क्षेत्र २ हे. ७४.३ आर. यांसी चतु:सिंमा :-**
पुर्वेस – मौजे चाहुराणा बु।। ची शीव दक्षिणेस – सर्व्हे नं.३१/२
पश्चिमेस – मौजे केडगांवची शीव उत्तरेस – सर्व्हे नं.३०
येणेप्रमाणे चतु:र्सिमापुर्वक शेतजमीन मिळकत, तदंगभुत वस्तुंसह काही एक राखुन न ठेविता.

**आमचे अशिल – १) श्री.संतोष हस्तीमल गुगळे २) सौ.जयश्री नरेश गुगळे ३) श्री.सचिन धरमचंद कटारिया**

ता.१२/०७/२०२५.
अहिल्यानगर.

**अॅड.एस.एच.निमसे**
रा.तान्हाहरी निवास, अक्षता गार्डनमागे, स्टेशनरोड,अहिल्यानगर,मो : 9422727137

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **१.अलीस अहमद मुश्ताक सय्यद २.फकिर महंमद समशेरखान पठाण ३. आसीफ चाँदसाहब शेख, रा.गोविंदपुरा अहमदनगर.** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन त्यांनी सदर मिळकत विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर सदर मिळकत कायमखुष खरेदी देण्यांचे ठरवून आमच्या अशिलाकडुन विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.
या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क,हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण,दान,बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.
**परिशिष्ट : १) मिळकत वर्णन :** जिल्हा तुकडी अहिल्यानगर / अहमदनगर पो.तु.ता. नगर पैकी अहिल्यानगर / अहमदनगर येथील महानगरपालिका हद्दीतील **मौजे सावेडी** येथील मा.दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कक्षेतील प्लॉटवर **'शालीमार टॉवर्स 'या अपार्टमेंट मधील तळ मजल्यावरील शॉप नं. २** याचे वर्णन खालील प्रमाणे.

| स.नं. | प्लॉट नं. | चौ.मी. |
|---|---|---|
| ६५/१अ/६६/१ | २१ | २६४.०० |

**सदर प्लॉटवर आर.सी.सी.पध्दतीचे बांधकाम झालेले 'शालीमार टॉवर्स 'या अपार्टमेंट मधील ग्राऊंड फ्लोअरवरील शॉप नं. २ याचे एकुण बिल्टअप क्षेत्र १६. १७ + कॉमन टॉयलेट एरिया ०.७१ चौ.मीटर. असे एकुण १६.८८ चौ.मी. ही संपुर्ण शॉप मिळकती बाबत.**
**यांसी चतुःसीमा –**
पूर्वेस : पार्किंग – २,डक्ट व कॉमन टॉयलेट दक्षिणेस : पार्किंग– ३
पश्चिमेस : १२ मीटर रस्त्या कडील बिल्डींग फ्रंट मार्जिन उत्तरेस : शॉप नं. १
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

अॅडव्होकेट
**नाजीम अहमद इस्माईल शेख**
**कुरेशी फैजान फारुक**
जीपीओ रोड,कलेक्टर ऑफिसशेजारी, अहमदनगर,
मो : 9881431860, 7276252478

दि.१२/०७/२०२५
अहमदनगर.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली जमीन विद्यमान मालक **अभिजीत विनोद गांधी रा. बी- ४, अभिश्वेत बंगला, इन्कम टॅक्स ऑफीस जवळ, कराचीवाला नगर, अहमदनगर** यांनी परिशिष्ट मध्ये नमुद केलेल्या मिळकती अन्सार निसार शेख यांचेपासुन मा. दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कार्यालयातील दस्त क्र. ४१०/२०२५ दि. १५/१०/२०२५, अनन- २ व दस्तक्र. २३२/२०२५ दि. १४/०१/२०२५, अनन - १ अन्वये खरेदी घेतलेली असुन सदर दोन्ही मिळकती विद्यमान मालक यांचे मालकी हक्काची व ताबे वहिवाटीची असुन त्यांनी सदर जमीन विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर सदर दोन्ही मिळकती कायमखुष खरेदी देण्यांचे ठरवून आमच्या अशिलाकडुन विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर जमीन मिळकती ह्या निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे. या उपरही सदर जमीन मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस,पोटगी हक्क,सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **१५ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.
**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन:** डि.।। अहिल्यानगर/अहमदनगर सब. डि.।। ता. नगर पैकी अहिल्यानगर/अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील **जेऊर** येथील जमीनीचे वर्णन खालील प्रमाणे.

| अ) ग.नं. | हे.आर, | रु.पै. |
|---|---|---|
| ३९८ | २.८३ | १.७५ |
| | पोख ०.२६ | |
| | ३.०९ | |

**यापैकी विद्यमान मालक यांचे मालकीची ० हे. २५ आर जमीनीबाबत. यासी चतु:सिमा-**
पुर्वेस – गट नं. ३९९ दक्षिणेस – गट नं. ३९८ पैकी
पश्चिमेस – गट नं. ३९८ पैकी उत्तरेस – शिव रोड

| ब) ग.नं. | हे.आर. | रु.पै. |
|---|---|---|
| ३९९ | १.४० | ००.९४ |
| | पोख ०.१० | |
| | १.५० | |

**यापैकी विद्यमान मालक यांचे मालकीची पश्चिम बाजुची ० हे. ७० आर + पो. ख. ० हे. ०५ आर असे एकुण क्षेत्र ० हे. ७५ आर जमीनीबाबत.**
**यासी चतु:सिमा–** पुर्वेस – गट नं. ३९९ पैकी दक्षिणेस – रस्ता
पश्चिमेस – गट नं. ३०० व ३९८ उत्तरेस – गट नं. ९२३
**येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.**

अॅडव्होकेट
**नाजीम अहमद इस्माईल शेख,**
**कुरेशी फैजान फारुक**
जीपीओ रोड,कलेक्टर ऑफिसशेजारी, अहमदनगर,
मो : 9881431860, 7276252478

दि.१२/०७/२०२५
अहमदनगर.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



आयएमएस कॉलेज आणि टीसीएस यांच्या संयुक्त उपक्रमाने ७५ मुलांची नोकरीसाठी निवड झाली.

# आयएमएस आणि टीसीएस यांच्या संयुक्त उपक्रमाने ७५ मुलांची नोकरीसाठी निवड

नगर – पुणे येथील टिसीएस कंपनीने नगरमधील आयएमएससीडीआर कॉलेजमध्ये ११ जुलै रोजी रोजगार मेळावा आयोजित केला होता. जास्तीत जास्त मुलांनी याचा फायदा घेतला असे संस्थेचे डायरेक्टर डॉ. एम.बी. मेहता, डॉ. विक्रम बार्नबस आणि प्रा. सुरेश खन्ना यांनी म्हटले आहे.

मेळावा सकाळी ८.३० वाजता सुरू झाला. जिल्ह्यातील २०० पदवीधरांनी यात सहभाग घेतला. टिसीएस कंपनीने यापैकी ७५ मुलांची निवड केली. यावेळी आयएमएस तर्फे डॉ. एम.बी. मेहता, डॉ. विक्रम बार्नबस व प्रा. सुरेश खन्ना यांनी कंपनीचे आभार मानले.

सध्याच्या स्पर्धेच्या युगात चांगला रोजगार, नोकरी मिळण्यासाठी परिश्रम घ्यावे लागतात. या पार्श्वभूमीवर आयएमएस संस्थेने टिसीएस कंपनीबरोबर खास नगर जिल्ह्यातील उमेदवारांसाठी रोजगार मेळावा घेतला.

रोजगार मेळावा यशस्वीतेसाठी प्रा. सुरेश खन्ना आणि त्यांच्या प्लेसमेंट टीम मधील डॅनियल वाघमारे, गरीमा यादव, महेश खरमाळे, धनश्री शिरसाठ, शरजील खान, श्रद्धा अकोलकर, हर्ष रणशिंग, प्रदीप कदम, मिहिर नलावडे, मयुर नलावडे, मयुर माने, शामल काळे, तांत्रिकी मदतीसाठी किरण सर, शिपाई नाना भोगाडे आणि नामदेव भगत यांनीही परिश्रम घेतले.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली जमीनीचे विद्यमान मालक **१. कमला रामचंद्र चौहान, २.विक्रम रामचंद्र चोहान, ३. बबिता रंजित चौहान, ४.रोहन रंजित चौहान, ५. सलोनी रंजित चौहान यांचे अ.पा.क.म्हणून आई, ६.छजलाने राणी सुरेन्द्र, ७. रजनी विजय नरवाला, ८. दीपा संतोष टाक सर्व रा भिंगार अहमदनगर.** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर जमीन विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरवून आमच्या अशिलाकडुन रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.
या उपरही सदर जमीन मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध,ताबा, मनाई, दावा,लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज,दान,बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.
**परिशिष्ट- मिळकतीचे वर्णन :**
डि ।। अहिल्यानगर/अहमदनगर सब.डि ।। ता.नगर पैकी अहिल्यानगर/अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे भिंगार** येथील मे.दु.निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कक्षेतील बिगरशेती प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

| स.नं. | प्लॉट नं. | चौ.मीटर |
|---|---|---|
| २२६/१३१/१३ २ | ४४ | ५१.७५ |

**हा संपुर्ण प्लॉट मिळकतीबाबत.**
**यांसी चतुःसिमा–**
पुर्वेस :- प्लॉट नं.४३ दक्षिणेस :- रस्ता
पश्चिमेस :- प्लॉट नं.४५ उत्तरेस :- प्लॉट नं.४९
**येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.**

अॅडव्होकेट
**नाजीम अहमद इस्माईल शेख**
**कुरेशी फैजान फारुक**
जीपीओ रोड,जुने कलेक्टर ऑफिसशेजारी, डावरेगल्ली,अहमदनगर,
मो : 9881431860, 7276252478

दि.१२/०७/२०२५
अहमदनगर.

# निरामय

## लाभ रोझमेरीच्या तेलाचे



आयुर्वेद आणि विकार

रोझमेरीचं तेल खूप उपयुक्त असतं. केस, त्वचेच्या आरोग्यासोबतच आपल्या सर्वांगिण आरोग्यासाठीही हे तेल उपयुक्त ठरू शकतं. या तेलाच्या उपयोगांविषयी...

* केसांच्या समस्या दूर करण्यासोबतच त्यांच्या वाढीसाठी ५० मिलीलीटर ॲप्रिकॉट किंवा ऑलिव्ह ऑईलमध्ये रोझमेरी तेलाचे ३० थेंब टाका. हे मिश्रण केस आणि स्काल्पला लावा. हे तेल रात्री लावल्यामुळे बरेच लाभ होऊ शकतील. या तेलामुळे कोंडा तसंच केसांच्या इतर समस्या दूर होऊ शकतील.

* पोटाच्या तक्रारी दूर करण्यासाठी ५० मिलीलीटर तिळाच्या तेलात रोझमेरी तेलाचे ३० थेंब टाका. झटपट आरामासाठी या मिश्रणाने पोटाच्या खालच्या भागावर मसाज करा.

* सर्दी-खोकल्यापासून आराम मिळवण्यासाठीही हे तेल उपयुक्त ठरतं. एका भांड्यात थोडं पाणी गरम करून घ्या. त्यात रोझमेरी तेलाचे चार ते पाच थेंब टाका. आता डोक्यावरून टॉवेल घेऊन या पाण्याची वाफ घ्या. तुम्हाला बरं वाटेल.

* डोकेदुखी, पाठदुखी, स्नायूंचं दुखणं, शारीरिक दुखणं तसंच मासिक पाळीच्या वेदना कमी करण्यासाठी ५० मिलीलीटर तिळाच्या तेलात रोझमेरी तेलाचे २५ थेंब टाका आणि या मिश्रणाने वेदना होणाऱ्या भागाला मसाज करा. तुम्हाला आराम मिळेल.

रोझमेरी किंवा इतर तेलांचा वापर करण्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्या. कोणतंही सुगंधी तेल गुणकारी तेल नसतं हे लक्षात ठेवा.

## धोका हायटल हर्नियाचा

व्याधी विकार

डॉ. दिलीप शिरसाट

हायटल हर्नियामध्ये पोटाचा काही भाग अन्ननलिकेच्या समोरील बाजूला छातीतमध्ये ढकलला जातो. यात पोटाचा भाग छातीच्या पिंजऱ्यातून डायाफ्रामच्या माध्यमातून निघतो. वाढत्या वयानुसार हायटल हर्निया होण्याची शक्यता वाढते. ५० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या ५५ ते ६० टक्के व्यक्ती हायटस हर्नियाने ग्रस्त असल्याचे दिसून येते. यापैकी नऊ ते दहा टक्के व्यक्तींमध्ये याची लक्षणे आढळून येतात.

हायटल हर्निया जन्मापासून असतो किंवा वाढत्या वयात उद्भवू शकतो. पोटात दाब निर्माण झाल्यामुळेही या प्रकारचा हर्निया होऊ शकतो. लठ्ठपणा, गर्भधारणा, दीर्घकालीन बद्धकोष्ठता, सीओपीडी, आघात, शस्त्रक्रिया आणि अनुवंशिकता यासारखे इतर घटकदेखील त्यासाठी कारणीभूत ठरतात. याचे मुख्य कारण म्हणजे स्नायू कमकुवत होणे.

**कशामुळे होतो हायटस हार्निया?**

हायटल हर्नियामध्ये पोटाचा वरचा भाग 'डायफ्रामॅटिक ओपनिंग'मधून छातीत ढकलतो. त्यामुळे अन्ननलिकेच्या खालच्या टोकावरील स्नायूंच्या झडपेला धोका निर्माण होतो. झडप सैल आणि शिथिल झाल्यामुळे पोटातील घटक आणि आम्ल अन्ननलिकेत जाऊ शकते. त्यामुळे 'गॅस्ट्रोएसोफेजियल रिफ्लक्स' हा रोग होतो. हायटल हर्नियाच्या सुरुवातीच्या टप्प्यात बहुतेकदा त्याची लक्षणे आढळून येत नाहीत आणि सामान्यतः औषधांनी त्यावर उपचार केले जातात. पुढच्या टप्प्यात मात्र त्यावर लॅपरोस्कोपिक फंडोप्लिकेशनच्या स्वरूपात शस्त्रक्रिया करावी लागते.


**लक्षणे कोणती?**

हायटल हर्नियाच्याची सुरुवातीला कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत. मात्र विकार वाढल्यावर खालील लक्षणे आढळतात.

* ढेकर येणे, उलट्या होणे
* छातीत जळजळ आणि ॲसिड रिफ्लक्स
* पोट किंवा छातीत दुखणे
* गिळण्यास त्रास होणे
* खूप पोट भरल्यासारखे वाटणे, विशेषतः जेवणानंतर
* काळ्या रंगाचा मल येणे किंवा रक्ताच्या उलट्या होणे, हे कधीकधी गॅस्ट्रोइंटेस्टाइनल ट्रॅक्टचे लक्षण असते.
* जुनाट खोकला आणि दम्यासारखी लक्षणे.
* आवाजात बदल होणे

**उपचार काय?**

जीवनशैलीत बदल हा उपचारांचा पहिला टप्पा आहे. बहुतेक हायटल हर्नियाची लक्षणे ही ॲसिड रिफ्लक्समुळे उद्भवत असल्याने, आहारातील बदल या समस्येत लक्षणीयरीत्या मदत करू शकतात. एकाच वेळी पोटभर न जेवता ठराविक अंतराने थोडे थोडे खाणे योग्य राहील. झोपण्यापूर्वी भरपेट आहार किंवा नाश्ता करणे टाळा. धूम्रपानाची सवय सोडणे हादेखील एक प्रभावी मार्ग आहे. छातीतील जळजळ टाळण्यासाठी जेवणानंतर लगेच झोपणे किंवा वाकणे टाळा. हायटल हर्नियाच्या उपचारांमध्ये औषधे महत्त्वाची भूमिका बजावतात. विशेषतः ॲसिड रिफ्लक्सशी संबंधित लक्षणे आढळल्यास याची मदत होते. अँटासिड्स सामान्यतः पोटातील ॲसिड निष्क्रिय करण्यासाठी वापरले जातात, तर एच२-रिसेप्टर ब्लॉकर्स हे ॲसिड उत्पादन कमी करण्यास मदत करतात. प्रोटॉन पंप इनहिबिटर (पीपीआय) हा आणखी एक प्रभावी पर्याय आहे, कारण ते ॲसिड उत्पादन पूर्णपणे रोखतात. त्यामुळे अन्ननलिकेचे कार्य सुरळीत राखता येते.




**शस्त्रक्रियेचा सल्ला कधी दिला जातो?**

रुग्णाला औषधे घेऊनही आराम मिळत नाही किंवा अन्ननलिकेतील अल्सर, श्वासनलिकेतील रिफ्लक्स, बॅरेट्स एसोफेगस आदींमध्ये गुंतागुंत निर्माण होते तेव्हा शस्त्रक्रियेची आवश्यकता भासते. अशा प्रकरणांमध्ये लॅप्रोस्कोपिक फंडोप्लिकेशन ही शस्त्रक्रिया केली जाते. ती त्यातल्या त्यात सर्वात सौम्य शस्त्रक्रिया मानला जाते. या शस्त्रक्रियेमुळे लक्षणे कमी होतात आणि भविष्यातील गुंतागुंतीदेखील टाळता येतात. फंडोप्लिकेशनमध्ये छातीतून हर्निएटेड घटक पोटात परत आणणे, सैल झालेली झडप घट्ट करणे आणि पोटाचे आवरण तयार करणे यांचा समावेश होतो. या प्रक्रियेत रुग्णांना कमी वेदना होतात. रुग्ण लवकर बरा होतो आणि शस्त्रक्रियेनंतर २४ ते ४८ तासांत त्यांना घरी सोडले जाते.

## सततच्या सर्दीकडे दुर्लक्ष नको



आरोग्य विशेष


डॉ. कुंदन गायकवाड

दर महिन्याला सर्दी, खोकला आणि फ्लू होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. दरवेळी नाकातून पाणी येणे, घसा खवखवणे आणि शिंका येणे हा केवळ हवामानाचाच परिणाम असेल असे नाही. वारंवार येणारी सर्दी हे एखाद्या गंभीर आजाराचे लक्षणदेखील असू शकते.

हवामान बदलल्यावर सर्दी होणे सामान्य आहे. परंतु दर काही आठवड्यांनी नाकातून पाणी येऊ लागले, घसा दुखू लागला किंवा शिंका येणे थांबले नाही तर प्रकरण गंभीर असू शकते. याचं सर्वात सामान्य कारण म्हणजे कमकुवत रोगप्रतिकारक शक्ती. शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमकुवत झाली तर ती विषाणू आणि जीवाणूंशी लढण्यास असमर्थ असते. त्यामुळे वारंवार सर्दी होऊ शकते. खाण्याच्या वाईट सवयी, झोपेचा अभाव, ताणतणाव आणि व्यायामाचा अभाव ही याची मुख्य कारणे आहेत. बऱ्याच लोकांना धूळ, धूर, परागकण, पाळीव प्राण्यांचे केस किंवा कोणत्याही अन्नपदार्थांची ॲलर्जी असते. ॲलर्जीमुळे वारंवार सर्दीसारखी लक्षणे देखील उद्भवतात.

थंडीसोबत डोकेदुखी, जडपणा आणि चेहऱ्यावर दाब जाणवत असेल तर ते सायनस इन्फेक्शन असू शकते. त्यात नाकाच्या हाडांभोवती असलेली सायनस पोकळी सुजते. थंडीमध्ये वारंवार श्वास घेण्यास त्रास होत असेल तर ते दम्याचे लक्षण असू शकते. बेचदा लोक ती किरकोळ सर्दी आहे, असे समजून त्याकडे दुर्लक्ष करतात; परंतु उपचार न केल्यास परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते. सर्दी झाल्यावर प्रत्येक वेळी अँटीबायोटिक्स घेण्याच्या सवयीमुळे रोगप्रतिकारशक्तीदेखील कमकुवत होऊ शकते. यामुळे आजार सहजपणे पकडू लागतात.

## हिप फ्रॅक्चर महिलांमध्ये अधिक



जाणून घ्या

डॉ. मेघा दळे

पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये हिप फ्रॅक्चरचे प्रमाण अधिक आहे. हा वाढलेला धोका मुख्यत्वे हार्मोन्समधील बदलांमुळे होतो. महिलांमध्ये हाडांची घनता कमी झाल्यामुळे हा धोका पहायला मिळतो. रजोनिवृत्तीनंतर इस्ट्रोजेन पातळीमध्ये अचानक घट झाल्यामुळे हाडांचे नुकसान होते, हाडांची रचना कमकुवत होते आणि हाडे तुटण्याची शक्यता वाढते, म्हणूनच, ५० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या महिलांनी हाडांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी योग्य खबरदारी घेणे आवश्यक आहे.

हिप फ्रॅक्चर हे बहुतेकदा हाडांमधील कमकुवतपणा, पडल्यामुळे किंवा किरकोळ दुखापतीमुळे होते. हिप फ्रॅक्चर झालेल्या व्यक्तीला दैनंदिन कामांसाठी इतरांवर अवलंबून रहावे लागते. लक्षणांमध्ये मांडीला अचानक वेदना होणे, पायावरील भार सहन न होणे, स्नायुंमधील ताठरता, जखम होणे आणि हाडांची घनता कमी होणे यांचा समावेश आहे. रजोनिवृत्तीनंतर महिलांमध्ये हे फ्रॅक्चर हे सामान्यतः इस्ट्रोजेनच्या कमतरते मुळे होऊ शकते. इस्ट्रोजेनची पातळी कमी झाल्यामुळे हाडे कमकुवत होतात. महिलांमध्ये नैसर्गिकरित्या पुरुषांपेक्षा हाडांची घनता कमी असते. त्यामुळे त्यांची हाडे अधिक नाजूक होतात आणि वयानुसार फ्रॅक्चर होण्याची शक्यता वाढते.

**शस्त्रक्रियेचा पर्याय किती गरजेचा?**

सुमारे वीस टक्के महिलांना रजोनिवृत्तीनंतर हिप फ्रॅक्चरचा धोका असतो. गेल्या दोन महिन्यांत, ५५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या २ ते ३ महिलांनी हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया केली आहे.

उपचारांमध्ये शस्त्रक्रिया, त्यानंतर पुनर्वसन, फिजिओथेरपीचा समावेश आहे. सध्या संपूर्ण हिप रिप्लेसमेंटसाठी सुपरपॅथ हे प्रगत तंत्रज्ञान वापरले जाते. ही एक लहान छिद्र पाडून केली जाणारी प्रक्रिया असून यामध्ये स्नायू आणि ऊतींचे नुकसान कमी होते. त्यामुळे जलद रिकव्हरी, कमीत कमी वेदना आणि रुग्णालयात राहण्याचा कालावधी कमी होतो. या पद्धतीमुळे शस्त्रक्रियेनंतर हिप डिस्लोकेशन आणि संसर्ग होण्याची शक्यता कमी होते. स्नायू आणि स्नायुबंध (लिगामेंट्स) यांना इजा न झाल्याने हे तंत्र अधिक नैसर्गिकरित्या सांध्यांची हालचाल करण्यास मदत करते. त्यामुळे दीर्घकालीन परिणाम सुधारतात. शस्त्रक्रियेनंतर रुग्ण स्वतंत्रपणे चालणे आणि मांडी घालून बसणे यासारख्या सामान्य क्रियादेखील करू शकतात.

**प्रतिबंधक उपाय**

प्रतिबंध हा सर्वोत्तम मार्ग असून आहारात कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डीचा समावेश करणे, नियमित व्यायाम करणे, धूम्रपान आणि मद्यपानाचे व्यसन टाळणे आणि वयानुसार हाडांची घनता तपासून घेणे गरजेचे आहे. रजोनिवृत्तीनंतर महिलांनी डॉक्टरांच्या सल्ल्याने हाडांना बळकटी देणारी औषधे घ्यायला हवीत.




## एचआयव्हीवर इंजेक्शनची मात्रा

नवे संशोधन

डॉ. गिरीश कुलकर्णी

एचआयव्हीच्या उपचारांमध्ये वैद्यकीय शास्त्राला मोठे यश मिळाले आहे. अमेरिकेत एका इंजेक्शनला मान्यता देण्यात आली आहे. एचआयव्हीच्या या विषाणूला रोखण्यासाठी हे इंजेक्शन वर्षातून दोनदा दिले जाऊ शकते. आरोग्यतज्ज्ञ एचआयव्ही विरुद्धच्या लढाईत हे एक महत्त्वाचे पाऊल मानत आहेत.

अमेरिकेच्या 'एफडीए' विभागाने 'गिलियड सायन्सेस'च्या लेनाकापावीर या इंजेक्शनला मान्यता दिली आहे. हे 'प्री-एक्सपोजर प्रोफिलॅक्सिस' किंवा 'पीईपी'च्या स्थितीत दिले जाते. दर सहा महिन्यांनी एक डोस देऊन एचआयव्ही संसर्ग रोखू शकणारे हे पहिलेच इंजेक्शन आहे. चाचणी दरम्यान हे इंजेक्शन संसर्ग रोखण्यासाठी ९९.९ टक्के प्रभावी असल्याचे दिसून आले. अशा प्रकारे कंपनीकडून दोनदा क्लिनिकल चाचण्या घेण्यात आल्या. पहिल्या चाचणीत दोन हजारांहून अधिक महिलांचा समावेश होता. महिलांवर या औषधाच्या क्लिनिकल चाचणीत शंभर टक्के प्रभावी परिणाम दिसून आले. दुसऱ्या चाचणीत पुरुषांचा समावेश होता. त्यापैकी फक्त दोघांमध्ये संसर्ग आढळून आला. एचआयव्ही रोखण्यासाठी हे औषध ९९.९ टक्के प्रभावी असल्याचे सिद्ध झाले. आजवर एचआयव्ही टाळण्यासाठी दररोज गोळ्या किंवा दर महिन्याला इंजेक्शन घेण्याची आवश्यकता होती. आता वर्षातून केवळ दोन इंजेक्शन्स घेऊन भागणार आहे. पण नवीन एचआयव्ही प्रतिबंधक इंजेक्शन 'लेनाकापावीर' खूप महाग आहे. त्याचा वार्षिक डोस २८ हजार डॉलर्सपेक्षा जास्त आहे. तो सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर आहे. आरोग्यतज्ज्ञांच्या मते, 'लेनाकापावीर' वैद्यकीय क्षेत्रात एक मैलाचा दगड ठरू शकते.

## मधुमेहींसाठी ब्रेडचे पर्याय



काय खावं?

मधुमेहींच्या खाण्यापिण्यावर बरीच बंधनं येतात. कर्बोदकांचं अधिक प्रमाण असणारे, अधिक कॅलरीचे गोड पदार्थ त्यांना खाता येत नाहीत. अधिक कर्बोदकं असणाऱ्या पदार्थांमध्ये ब्रेडचाही समावेश होतो. मधुमेहींनाही ब्रेड खायला मनाई केली जाते. मात्र ब्रेड खायची वेळ आलीच किंवा एखाद्या वेळी ब्रेड खावासा वाटला तर कोणत्या ब्रेडची निवड करावी, याविषयी...

* ब्रेड घेण्याआधी त्यातल्या पोषणमूल्यांबाबत जाणून घेणं गरजेचं आहे. त्यामुळे पाकिटातल्या पोषणमूल्यांची माहिती वाचून मगच ब्रेड खरेदी करा.

* अमेरिकन डायबेटिक असोसिएशनच्या म्हणण्यानुसार मधुमेहींनी पूर्ण धान्याचा किंवा गव्हाचा ब्रेड खावा. मैद्याचा पांढरा ब्रेड शक्यतो टाळावा.

* ओट्स, जवस आणि गव्हाचा पीटा ब्रेड मिळतो. या ब्रेडमध्ये फायबरचं प्रमाण बरंच जास्त असतं. यात कर्बोदकंही कमी प्रमाणात असतात. या ब्रेडची चवही चांगली असते. या ब्रेडमुळे तुमची कर्बोदकं खाण्याची इच्छा कमी होऊ शकते.

* फायबरयुक्त गव्हाचा ब्रेडही मधुमेहींसाठी चांगला पर्याय आहे. पण तुम्ही दर्जेदार गव्हाचा ब्रेड घ्या. या ब्रेडमुळे पोट बराच काळ भरलेलं रहातं. यामुळे वजन कमी करण्याची प्रक्रियाही सुलभ होते.

* मधुमेहींसाठी मल्टीग्रेन ब्रेडचा पर्यायही उपलब्धआहे. मल्टीग्रेन ब्रेडमधल्या फायबरमुळे पोट बराच काळ भरलेलं रहातं. चांगल्या कंपनीचा मल्टीग्रेन ब्रेड रक्तातलं साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेऊ शकतो.

* ग्लुटन फ्री ब्रेड आंधळेपणाने विकत घेऊ नका. कारण ग्लुटन फ्री ब्रेडमध्ये कर्बोदकांचं प्रमाण बरंच अधिक असू शकतं. ग्लुटनची ॲलर्जी असेल तरच ग्लुटन फ्री ब्रेड खरेदी करा.

## सतत इयरफोन घातल्यामुळे...




कुठे चुकतो आपण?

सध्या बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे हेडफोन, ईयरफोन पहायला मिळतात. तरुण मंडळी कानात ईयरफोन घालून गाणी ऐकत किंवा चित्रपट बघत बसतात. पण अशा प्रकारे सतत कानात हेडफोन घालून ठेवल्यामुळे बहिरेपणा येऊ शकतो. बरेच तज्ज्ञ डॉक्टर याबाबत इशारा देतात. कानात ईयरफोन घालून बराच काळ मोठ्या आवाजात गाणी ऐकल्यामुळे श्रवणदोष निर्माण होऊ शकतात. खरं तर ईयरफोन्सपेक्षाही मोठ्या आवाजामुळे कानाला त्रास होतो. ईयरफोन्स घातल्यानंतर आवाज थेट कानांमध्ये जातो. मोठ्या आवाजामुळे कानांचे पडदे फाटू शकतात.

तुम्ही ईयरफोनद्वारे किती वेळ, किती काळ आणि किती मोठ्या आवाजात ऐकता यावर कानांचं आरोग्य अवलंबून असतं. ईयरफोनच्या वापरामुळे श्रवणशक्तीवर होणाऱ्या परिणामांबाबत जागतिक स्तरावर बराच अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासातून ईयरफोनच्या वापराचे काही दुष्परिणाम समोर आले आहेत. ईयरफोनच्या सततच्या वापरामुळे टिनिटस नावाचा विकार होऊ शकतो. टिनिटस हे कानाची नस दुखावली गेल्याचं लक्षण मानलं जातं. ईयरफोन कानात घातले जातात तर हेडफोन्स कानांवर लावले जातात. त्यामुळे ईयरफोनऐवजी हेडफोन्सचा वापर करणं योग्य ठरतं. टिनिटस या विकारात कानात घंटा वाजल्यासारखा आवाज येतो. या विकारावर वेळीच उपचार न केल्यास त्रास अधिक वाढत जातो.

## उदबत्तीचा धूर सिगारेटपेक्षाही घातक



चर्चेत

डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे

रोज सकाळी आणि संध्याकाळी देवाजवळ दिवा लावला जातो. धूप, उदबत्ती लावली जाते. पण यामुळे नकळत आरोग्याला मोठे नुकसान होत आहे. अगरबत्ती लावल्यानंतर म्हणजे जाळल्यानंतर त्यातून निघणारा धूर आरोग्यासाठी घातक ठरू शकतो. उदबत्ती आणि धूपात वापरल्या जाणाऱ्या 'पॉलीएरोमॅटिक हायड्रोकार्बन्स' (पीएएच) चा फुफ्फुसांवर खूप वाईट परिणाम होतो.

उदबत्तीतून निघणाऱ्या धुराचा शरीराच्या पेशींवर वाईट परिणाम होतो आणि तो सिगारेटच्या धुरापेक्षा जास्त विषारी असतो. उदबत्तीच्या धुरात असलेले रसायन फुफ्फुसांच्या पडद्यांमध्ये संसर्ग निर्माण करू शकतात. त्याच्या धुराच्या सतत संपर्कात राहिल्याने फुफ्फुसांच्या पेशींमध्ये ॲलर्जी होऊ शकते.

**त्वचेची ॲलर्जी**


धूप आणि उदबत्तीचा वापर जास्त काळ केल्याने डोळे आणि त्वचेशी संबंधित ॲलर्जी होऊ शकते. या गोष्टी जाळल्याने निघणाऱ्या धुरामुळे डोळ्यांची जळजळ होते, तर संवेदनशील त्वचा असलेल्या लोकांना या धुराच्या संपर्कात येताच त्वचेला खाज येऊ शकते.

**मेंदूवर वाईट परिणाम**

सुगंधित उदबत्ती आणि धुपामधून निघणाऱ्या रासायनिक धुराचा व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. या गोष्टींचा दीर्घकाळ वापर केल्याने डोकेदुखी, एकाग्रतेचा अभाव, स्मृतिभ्रंश आणि अल्झायमर सारख्या आजारांचा धोकादेखील वाढू शकतो.

नवसंशोधन

### लाळेची किफायतशीर चाचणी



कर्करोगाच्या निदानाची प्रक्रिया खूप गुंतागुंतीची आणि खर्चिक असते. पण शास्त्रज्ञांच्या प्रयत्नांमुळे कर्करोगाचं निदान किफायतशीर अशा लाळेच्या चाचणीने होऊ शकतं. या अत्यंत किफायतशीर अशा लाळेच्या चाचणीमुळे ह्युमन पॅपिलोमा १६ विषाणूचं निदान करता येतं. हा विषाणू घसा, तोंडाच्या कर्करोगाला कारणीभूत ठरू शकतो. या चाचणीमुळे तोंडाच्या तसंच घशाच्या कॅन्सरचं वेळेत निदान होऊ शकतं. अमेरिकेतल्या ड्यूक विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं आहे. हे तंत्रज्ञान इतर काही विकारांच्या निदानासाठी उपयुक्त ठरू शकतं, असंही शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.

दंतारोग्य

### ओव्याने दूर करा तोंडाच्या समस्या



हिरड्या सुजणं, तोंडाची दुर्गंधी या मौखिक आरोग्याशी संबंधित सर्वसाधारण समस्या आहेत. तोंड स्वच्छ ठेवलं नाही तर दातांमध्ये साठलेलं अन्न कुजून दुर्गंध येऊ लागतो. ही समस्या दूर करण्यासाठी बरेच उपाय केले जातात. ओव्याच्या पाण्याने तोंडाची दुर्गंधी दूर होऊ शकते. यासाठी थोड्या पाण्यात ओवा घालून उकळून घ्या. या पाण्याने चूळ भरल्यामुळे तोंडाच्या दुर्गंधीची समस्या कमी होऊ शकते. हिरड्यांमधून रक्त येत असेल तर ओव्याच्या तेलाचे काही थेंब गरम पाण्यात घालून या पाण्याने चूळ भरल्यामुळे हिरड्यांमधलं रक्त थांबू शकतं.

जपणूक त्वचेची


### त्वचेवर दिसतात परिणाम



शरीरात एखाद्या पोषक घटकाची कमतरता असल्यास त्याची लक्षणं दिसू लागतात. त्वचा पांढरी पडणं, त्वचेवर चट्टे पडणं, पिंपल्स येणं ही एखाद्या पोषक घटकाच्या कमतरतेची लक्षणं असू शकतात. त्वचा निस्तेज, पांढरट दिसणं हे बी १२ या जीवनसत्त्वाच्या कमतरतेचं लक्षण असू शकतं. त्वचेवर पुरळ किंवा पिंपल्स येत असतील तर हे 'अ' आणि 'ई' या जीवनसत्त्वांच्या कमतरतेचं लक्षण ठरू शकतं. त्यामुळे त्वचेच्या समस्या असतील तर या जीवनसत्त्वांच्या कमतरतेची तपासणी नक्की करून घ्या.

आजीबाईचा बटवा

### नैराश्यावर प्रभावी उपाय



सध्या अनेकांना नैराश्याने ग्रासल्याचं पहायला मिळतं. नैराश्याच्या या समस्येवर बरेच उपचार करावे लागतात. पण काही घरगुती उपायांनी तुम्हाला बरं वाटू शकतं. हळद आणि लिंबाच्या मिश्रणामुळे नैराश्य तसंच इतर मानसिक आजारांमध्ये बरं वाटू शकतं. यासाठी एका भांड्यात चार कप पाणी घ्या. त्यात एका लिंबाचा रस घाला. यात दोन चमचे हळद आणि चार चमचे मध घाला. हे सर्व घटक नीट मिसळून घ्या. दिवसातून दोन वेळा हे पाणी प्या. यामुळे लाभ होतील. हळदीतल्या पोषक घटकांमुळे नैराश्याची तीव्रता कमी होऊ शकते.

# शासनाच्या शिक्षणविषयक निर्णयांमुळे मराठीसह सर्व माध्यमांच्या अनुदानित शाळा अडचणीत

## समस्यांबाबत समन्वय समिती आक्रमक : जिल्हाधिकारी कार्यालय येथे निदर्शने

नगर – राज्य शासनाच्या शिक्षणविषयक निर्णयांमुळे मराठीसह सर्व माध्यमांच्या अनुदानित शाळा अडचणीत सापडल्या आहेत. काही शाळा बंद झाल्या असून अनेक शाळा बंद होण्याच्या उंबरठ्यावर आहेत. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर समन्वय समितीच्या वतीने अध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर येथे सकाळी १० वाजता निदर्शने करण्यात आली. यावेळी शासनाकडे मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गांधी मैदान, नवीपेठ, अहिल्यानगर यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री व जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शासनाकडे हे निवेदन देण्यात आले. शासनाच्या विविध धोरणांमुळे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मुख्याध्यापक यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या निवेदनाद्वारे काही महत्त्वाच्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले.

या निवेदनातील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे – १. दिनांक १५ मार्च २०२४ चा संचमान्यता संदर्भातील शासन निर्णय रद्द करून २८ ऑगस्ट २०१५ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी. २. शिक्षक भरती प्रक्रिया वर्षातून दोन वेळा पोर्टलद्वारे राबवावी. ३. दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी. ४. दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार अघोषित शाळांना मान्यता द्यावी व अनुदान टप्पा त्वरीत मंजूर करावा. ५. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध रद्द करून चतुर्थ श्रेणी व इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती पूर्वीप्रमाणे करण्यात यावी.



राज्य शासनाच्या शिक्षणविषयक निर्णयांमुळे मराठीसह सर्व माध्यमांच्या अनुदानित शाळा अडचणीत आल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय येथे निदर्शने करून निवेदन देण्यात आले.

या आंदोलनाबाबत प्राचार्य सुनिल पंडित यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, शिक्षक फक्त शिकवत नाही, तर व्यवस्थेतील त्रास सहन करत शाळा उभ्या ठेवतो आहे. शासनाचे निर्णय शाळा बंद होण्याकडे नेत आहेत. शिक्षक भरती बंद, अनुदान अडकले, जुनी पेन्शन नाही – यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मानसिक व आर्थिक अडचणीत आहेत. शासनाने हे गंभीरपणे घ्यावे, अन्यथा आम्हाला तीव्र आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागेल.

या आंदोलनात जिल्ह्यातील अनेक शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. त्यांनी शासनाच्या निर्णयांविरोधात शिस्तबद्ध व शांततेने निदर्शने करून आपला संताप व्यक्त केला.

शिक्षण क्षेत्राच्या सक्षमीकरणासाठी या मागण्या लवकरात लवकर मान्य करण्याची मागणी समितीने शासनाकडे केली आहे. या आंदोलनामध्ये माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन व माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे, प्राथमिक शिक्षक संघटनेचे राज्य सचिव विठ्ठल उरमुडे, सोसायटीचे संचालक महेंद्र हिंगे, ज्ञानदेव बेरड, वैभव सांगळे, सोपानराव कदम, श्रीकृष्ण पवार, प्रसाद सामलेटी, सचिन गुंजाळ, आर वी शिदोरे, बोडके जी, बाबासाहेब शिंदे, दीपक आरडे, नितीन केणे, राजेंद्र जगड, उद्धवराव गुंड, घनश्याम सानप, ग.अ. गाडगीळ, नितीन शेखर, मुंडे म्हस्के, शंकर आढाव, अशोक सोनवणे, संदीप राहणे, नाकाडे अण्णासाहेब, श्रीकांत शेलार उपस्थित होते.





सैन्य क्षेत्रालगत अनेक वर्षापासून वास्तव्यास असलेल्या रहिवाशांना नगर–सोलापूर रोड येथूनच पर्यायी रस्ता मिळावा मोतीबाग येथील रहिवाशांची जिल्हाधिकाऱ्यांकडे पर्यायी रस्त्याची निवेदनाद्वारे मागणी केली. शेजारील छायाचित्रात रहिवाश्यांनी खासदार निलेश लंके यांची भेट घेऊन याबाबत माहिती देऊन चर्चा केली.

# सैन्य क्षेत्रालगत अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या रहिवाशांना नगर–सोलापूर रोड येथूनच पर्यायी रस्ता मिळावा

## मोतीबाग येथील रहिवाशांची जिल्हाधिकाऱ्यांकडे पर्यायी रस्त्याची निवेदनाद्वारे मागणी

नगर – सैन्य क्षेत्रालगत अनेक वर्षापासून वास्तव्यास असलेल्या रहिवाशांना नगर–सोलापूर रोड येथूनच पर्यायी रस्ता मिळावा यासाठी नगर–सोलापूर रोड मोतीबाग येथील नागरिकांनी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे मागणी केली.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष महिला अल्पसंख्यांकच्या शहर अध्यक्ष निताताई बर्वे, भिंगार महिला कॉंग्रेसच्या अध्यक्ष मार्गरेट जाधव, लताबाई गायकवाड, कमल जाधव, सुनील आल्हाट, सुनिता जाधव, ज्योती जाधव, लंकाबाई रासकर, शिल्पा आल्हाट, खुशी जाधव रेखा आगळे, कमल रासकर, संजय आगळे, सोहम रासकर, लताबाई जाधव, सागर जाधव उपस्थित होते.

या रस्त्याबाबत मोतीबाग येथील रहिवाशांनी माजी महापौर अभिषेक कळमकर यांच्या नेतृत्वाखाली खासदार निलेश लंके यांची भेट घेऊन याबाबत माहिती देऊन चर्चा केली. खा. लंके यांनी या रस्त्याबाबत संरक्षण मंत्रालयाशी पत्रव्यवहार करून लवकरच नागरिकांना पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्याची ग्वाही नागरिकांना दिली. मोतीबाग हे नगर सोलापूर रोड लगत असलेला रहिवाशी भाग असून रोड लगत असलेल्या इंदिरा हाऊसिंग सोसायटी ते मोतीबाग या ठिकाणी सैन्याकडून संरक्षक भिंत बनवण्यात येत आहे. या ठिकाणी ७० ते ७५ कुटुंबे मागील अनेक वर्षांपासून राहत आहेत. सैन्यांकडून बांधण्यात येणाऱ्या संरक्षक भिंतीमुळे काही कुटुंबे संरक्षक भिंतीच्या आत व काही कुटुंबे संरक्षक भिंतीच्या बाहेर अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. भिंतीच्या आतील बाजूस वास्तव्यास असणाऱ्या रहिवाशांना पर्यायी रस्ता म्हणून जामखेड रोड येथून विशेष पासद्वारे ये जा करावी लागणार आहे. पासधारकाव्यतिरिक्त इतर कोणासही या ठिकाणी येता जाता येणार नाही अशी सूचना सैन्यातील अधिकाऱ्यांनी या ठिकाणी असणाऱ्या नागरिकांना दिली परंतु हे अंतर जास्त असून नागरिकांना सोईस्कर नाही. या ठिकाणी अनेक विद्यार्थी शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेत असून शाळा व खाजगी शिकवणीसाठी अनेकदा त्यांना बाहेर ये जा करावी लागते त्यामुळे त्यांचे मोठे नुकसान होऊ शकते. त्याचप्रमाणे येथील अनेक युवक हे एमआयडीसी येथील कंपनीत असून कंपनीत शिफ्ट नुसार काम चालते त्यामुळे त्यांना देखील हे सोयीचे नाही. या ठिकाणी राहत असलेल्या वृद्ध नागरिकांना औषध उपचारासाठी दवाखान्यात रात्री अपरात्री न्यावे लागते त्यामुळे जामखेड रोड येथील रस्ता हा रहिवाशांच्या दृष्टीने सोयीस्कर नसून नगर–सोलापूर रोड येथूनच पर्यायी रस्ता मिळावा अशी मागणी येथील नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.

# जिजामाता उद्यानातील झाडे मनपा कर्मचाऱ्यांनी तोडली

## अहिल्यानगर महानगरपालिकेच्या विरोधात हरित लवादाकडे तक्रार

नगर – शहरातील भवानी नगर भागातील नागेश्वर मंदिराच्या परिसरात जिजामाता उद्यानात अनेक मोठी झाडे होती व मागील काळात वृक्षारोपण निधीतून लावण्यात आलेली ४७ झाडे सुध्दा होती परंतु ही महानगर पालिकेच्या उद्यान विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तोडली आहे, कोणाचीही तक्रार नसतांना. कोणालाही अडथळा नसताना इतक्या मोठ्या प्रमाणात छोटी, मोठी झाडे तोडण्याचा प्रकार महानगर पालिकेने केला आहे. याबाबत वृक्ष प्राधिकरण समितीकडून सुध्दा कुठल्याही प्रकारे झाडे तोडण्याची, काढण्याची परवानगी घेतलेली नाही. असा आरोप करत याबाबत नितीन भूतारे यांनी हरित लवादाकडे तक्रार केली आहे.



जिजामाता उद्यानातील तोडलेल्या झाडांचे बुंधे छायाचित्रात दिसत आहेत.

या तक्रारीत त्यांनी म्हंटले आहे की, वसुंधरा महोत्सव अंतर्गत याच ठिकाणी सुशोभीकरण काम सुरू असून. त्याच वसुंधरा महोत्सवात झाडे जगवा, पर्यावरण वाचवा हा संदेश महानगरपालिका देते आणि एका बाजूला झाडे तोडण्याचे काम करत आहे. उद्यान विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि बांधकाम विभागातील अधिकारी आणि ठेकेदार यांच्यामुळे ही झाडे तोडण्यात आली आहे. वसुंधरा महोत्सवात झाडे जगविण्याऐवजी तोडण्याचे काम महानगर पालिका करत आहे.

उद्यान विभागातील अधिकारी हे अश्या प्रकारे मनमानी काम करत असल्यामुळे. त्यांच्यावर योग्य ती चौकशी करून उद्यान विभागातील अधिकारी तसेच बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांवर, नागेश्वर मंदिर परिसरातील काम सुरू असलेल्या ठेकेदारावर झाडे तोडल्या प्रकरणी व पर्यावरण धोक्यात आणल्या मुळे कारवाई करण्यात यावी व गुन्हा दाखल करावा अशी मागणी नितीन भुतारे यांनी वनमंत्री तसेच महाराष्ट्र प्रदूषण मंडळ, हरित लवाद यांच्याकडे मेल द्वारे निवेदन पाठवून केली आहे.

## सीए अंतिम परीक्षेत मिताली फिरोदिया उत्तीर्ण

नगर – २०२५ सालच्या सीए अंतिम परीक्षेत कु. मिताली फिरोदिया हिने यश मिळवले आहे. अभ्यासात परिश्रम व सातत्य ठेवल्याने तिला हे यश प्राप्त झाले आहे असे तिने सांगितले. या अभ्यासक्रमात तिला सीए योगेश कटारीया (Spay & Co ) व सीए सुजित फिरोदिया (PM Firodiya Company) यांचे मार्गदर्शन लाभले.



मिताली ही आडते बाजार, अहिल्यानगर येथील व्यापारी नरेश रतिलाल फिरोदिया (नरेशकुमार संदेशकुमार आणि कंपनी) यांची मुलगी, गिरीश व ॲड. सुरेश फिरोदिया यांची पुतणी आहे.

## सीएफए परीक्षेत रोहन बोरा उत्तीर्ण

नगर – मे २०२५ मध्ये झालेल्या चार्टर्ड फायनान्शियल ॲनालिस्ट (सीएफए) परीक्षेत सीए रोहन बोरा हा ९० टक्के परसेंटाईल गुणांनी उत्तीर्ण झाला.



रोहन हा मे २०२४ सीए परीक्षेत उत्तीर्ण झाला असून त्याने पुणे येथील यु.बी.एस. या फायनाशियल फर्ममध्ये काम करत हे यश संपादन केले. रोहन याला सीए अशोक पितळे, सीए गौरव पितळे यांचे मार्गदर्शन लाभले. तो सुरेशलाल, लता बोरा यांचा नातू तर सचिन व दिपा बोरा यांचा मुलगा आहे. जिद्द, चिकाटी व कठोर मेहनत घेत त्याने हे यश संपादन केले आहे.



## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली **प्लॉट मिळकत चे विद्यमान मालक वसंत जयवंत लांबाटे व शीला वसंत लांबाटे दोघे रा. अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीच्या आहे. सदर प्लॉट मिळकती त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या प्लॉट मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला असून आमच्या आशिलाकडून विद्यमान मालक यांनी विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर प्लॉट मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकत बाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा **साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही** नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर प्लॉट मिळकती निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन** :- डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे सावेडी** येथील खालील वर्णनांची प्लॉट मिळकत : –

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ५९/२ब / ६०/६१ | ४२५ | २८८.०० चौ.मी. |

**हा संपूर्ण खुला प्लॉट. यांसी चतु:सिमा -:**

पुर्व – ९ मी रस्ता, दक्षिण – प्लॉट नं.४२४

पश्चिम – सर्व्हे नं.५२ पैकी, उत्तर – प्लॉट नं.४२६

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकती दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकती.

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
मो नं. ९८६०६४६४६३,
ऑफिस– गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर

अहिल्यानगर
दिनांक :– १२/०७/२०२५


# गुरुंच्या मार्गदर्शनानेच यशाचा प्रकाश मिळतो

## बाळकृष्ण सिद्दम यांचे प्रतिपादन; श्री मार्कंडेय विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी, गरजू विद्यार्थ्यांना साहित्य वाटप

नगर – गुरु म्हणजे केवळ अध्यापक नसून जीवनाला दिशा देऊन यशाकडे घेऊन जाणारा मार्गदर्शक असतो. गुरुंच्या मार्गदर्शनानेच यशाचा प्रकाश मिळतो. आजच्या बदलत्या काळात विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी शिक्षकांचे योगदान मोलाचे ठरत असल्याचे बाळकृष्ण सिद्दम यांनी सांगितले.

गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून गुरुंबद्दलची कृतज्ञता व्यक्त करत गुरु–शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमामध्ये गरजू विद्यार्थ्यांना गणवेश आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा माजी प्राचार्य बाळकृष्ण सिद्दम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षिका भारती सानम, संस्थेचे विश्वस्त राजेंद्र म्याना, मुख्याध्यापक संदीप छिंदम, उपमुख्याध्यापक पांडुरंग गोने, पर्यवेक्षक प्रमोद चन्ना, तसेच शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी सुहास बोडखे उपस्थित होते.



श्री मार्कंडेय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त गरजू विद्यार्थ्यांना गणवेश आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

भारती सानम म्हणाल्या की, भारतीय संस्कृतीमध्ये गुरुचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. गुरुंच्या माध्यमातून अनेक व्यक्ती यशोशिखरावर पोहचली असल्याचा इतिहास आहे. विद्यार्थ्यांनी देखील आपल्या गुरुंचा आदर राखून त्यांच्या मार्गदर्शनाने जीवनाची वाटचाल करण्याचे त्यांनी आवाहन केले.

शिक्षक प्रतिनिधी अर्चना साळुंके यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या कार्यकुशलतेतून यश संपादन करणे, हीच गुरुंसाठी खरी गुरुदक्षिणा असते, असे सांगून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. ज्येष्ठ शिक्षिका रेणुका खरदास यांनी प्रास्ताविकात विद्यालयातील गुणवत्ता आणि संस्कारक्षम उपक्रमांची माहिती दिली.

बाळकृष्ण सिद्दम यांनी गरजू विद्यार्थ्यांच्या गणवेश आणि शैक्षणिक साहित्यासाठी २० हजार रुपयांची मदत दिली. तर समाजातील दानशूर व्यक्तींनी देखील या उपक्रमास आर्थिक हातभार लावला. कविता गुडेवार यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त उत्कृष्ट असे फलक लेखन करुन चित्र रेखाटले होते. सूत्रसंचालन मनिषा राठोड यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# ओंकारनगर शाळेत माता–पिता पाद्यपुजेने गुरुपौर्णिमा साजरी

## वैदिक मंत्रोपचारात विद्यार्थ्यांनी केले माता–पिता पाद्यपुजन, मनपा ओंकारनगर शाळेत श्री सत्यसाई सेवा संघटनेचा उपक्रम

नगर – आई ही मुलांची पहिली गुरु असते. महान माता महान पुरुष घडवतात. पालक हे जिवंत देव आहेत. मुले त्यांचा सर्वात मौल्यवान खजिना आहेत. माता–पिता पाद्यपूजनातून गुरुसेवा गुरुपौर्णिमेच्या दिवशी करण्याचा उपक्रम महानगरपालिका ओंकारनगर शाळेत श्री सत्यसाई सेवा संघटनेने उत्साहात साजरा केला.



ओंकारनगर शाळेत माता–पिता पाद्यपुजेने गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली.

बालकांनी वैदिक मंत्रोपचाराच्या निनादात आपल्या मातापित्यांची पाद्यपूजा करून त्यांच्या समोर नतमस्तक होऊन अभिवादन केले. केडगाव येथील महानगरपालिका ओंकारनगर शाळा, ओंकारनगर अंगणवाडीतील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. आई–वडिलांना आकर्षक खुर्चीवर, चौरंगावर बसवून वेदमंत्र, श्लोक पठण, साईबाबांची भजने गात पूजन केले. पत्रकार अनिल हिवाळे यांनी दीप प्रज्वलन केले.

ओंकारनगर शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी, अध्यापक शिवराज वाघमारे, वृषाली गावडे, अंगणवाडीच्या सौ. विजया घोडके, रोहिणी दळवी यांचा संस्कार क्षेत्रातील योगदानाबद्दल याप्रसंगी सन्मान करण्यात आला. आराध्या भुजबळ, गीतांजली उमाप, भैरवी रणशिंग, प्रणिता बडे, श्रेया पाचारणे, भक्ती सोमनायक, अर्णव तोडमल, यशराज जगताप, ओम घेवारे या विद्यार्थ्यांनी गुरु रूपावर मनोगते सादर केली.

श्री सत्यसाई संघटनेचे जिल्हाप्रमुख अशोक कुरापाटी यांनी सत्यसाई बाबांच्या विश्वव्याप्त शैक्षणिक कार्याची माहिती देऊन सांगितले की, 'आयुष्यात कितीही मोठे व्हा, उत्तम व्यवसाय करा, उच्च अधिकारी बना, मोठ्या पगाराची नोकरी मिळवा, पण आपल्या देशातील खरे मानकरी म्हणजे आई–वडील, जिथे शिकले ती शाळा, कॉलेज, शिक्षण संस्था, क्लासेस, गुरुजन, प्रोत्साहन देणारे हितचिंतक – यांचा विसर पडू देऊ नका,' असा प्रेरक संदेश विविध महापुरुष, समाजसेवकांच्या जीवनातील प्रसंग सांगून उपस्थितीवर बिंबविला.

महाप्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.



गुरुपौर्णिमेनिमित्त भाजपच्यावतीने मठ मंदिर प्रमुखांचा सन्मान करण्यात आला. यावेळी श्री व्यंकटेश मंदिरात गुरुपूजन करताना जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते व पदाधिकारी.

# गुरुपौर्णिमेनिमित्त भाजपकडून मठ–मंदिर प्रमुखांचा सन्मान

नगर – गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने भारतीय जनता पक्ष, नगर शहराच्या वतीने शहरातील विविध मठ–मंदिरांतील प्रमुख गुरुजनांचे पूजन करून सन्मान करण्यात आला. या उपक्रमातून गुरु–शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करत समाजातील आध्यात्मिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्यात योगदान देणाऱ्या व्यक्तींना आदरांजली अर्पण करण्यात आली.

याचा प्रारंभ बूथ हॉस्पिटलसमोरील पुरातन श्री व्यंकटेश मंदिरात करण्यात आला. या ठिकाणी मंदिराचे प्रमुख गुरुवर्य रामप्यारी बैरागी यांचे पूजन व सत्कार शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी गुरुपौर्णिमा उत्सव जिल्हा संयोजक गोपाल वर्मा, तसेच भाजपचे इतर कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

